जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१४ । मूल्य ३० रुपये

# सगुणा




गणेश
रामचंद्र
आपटे
अथांग क्षितिजाची ... उत्तुंग झेप !
एक नातं शतकाचं... 'मे. गणेश रामचंद्र आपटे' आणि सोलापूरकरांचं...
सोनेरी धाग्यात गुंफलेलं... रुपेरी किनार आणि हिऱ्यामाणकांची कोंदण असलेलं...
आपणां सर्वांची सोनं, चांदी दागदागिने आणि जडजवाहीरांची हौस पुरविताना
आमच्या पाच पिढ्या सोलापूरकरांच्या सोनेरी विश्वासानं उजळल्या...
आता 'गणेश रामचंद्र आपटे' नव्या क्षेत्रात पदार्पण आहेत...
आजवर बावनकशी सोनं दिलं, आता अद्ययावत
घर देणार आहोत...'इंद्रधनु'च्या रूपानं...
सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात साकारणारा
'इंद्रधनु'हा महागृहप्रकल्प सर्व सुखसोयींनी सुसज्ज असेल.
जिथं आपलं समृद्ध जीवनशैलीचं स्वप्न साकार होईल...
॥ गणेश रामचंद्र आपटे ॥
सोलापूर: फोन: २३२४१३९
आपटे ट्रेडर्स
सोलापूर: फोन: २३२६१२१
ज्वेलर्स
पुणे : २४४५७०९०
इंद्रधनु
Indradhanu
सोलापूर: फोन: २३८०३९०

# सगुणा

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१४ । वर्ष-२, अंक-३

संपादक : **शोभा करांडे** (संपर्क : ९४२२०१३५८८)

मुखपृष्ठ : मल्हार करांडे । रेखाटने : सुनील अवचार । मूल्य : ३० रुपये । वार्षिक वर्गणी : १०० रुपये



**संपादकीय** : २, **मानाचे पान** : युरोपकेंद्रित स्त्रीप्रश्न : कॉम्रेड विलास सोनवणे - २२ । **लेख** : बहुजन न्यूनगंड : कॉम्रेड विलास सोनवणे - ५ । ओळख हरवलेली आहे... : डॉ० राजश्री देशपांडे - १५ । महिलांच्या राखीव जागांचे राजकारण : प्रा. वैशाली पवार - १२ । स्मशानातली चूल : शरिफा बाले - ३३ । **इचारात सगुणा** : रिकामी चौकट - २९ । **मुलाखत** : आचार-विचार हेच खरे सौंदर्य : डॉ० उज्ज्वला दहिफळे, संवादक : झेबा शेख मिन्ने - ३६ । कविता : शोभा करांडे - ४०

---

संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस० पी० कॉलेजमागे, पुणे ४११०३० । दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५ / ०९८२०२३५०३०

MAHMAR/2013/52241 / website : www.sagunatrust.org / Email : shobhakarande62@gmail.com

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एंटरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे. ४११०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

'गुणांसह सगुणा'चा हा अकरावा अंक. गेली दोन वर्षं 'सगुणा' बहुजन स्त्रियांना समजून घेऊन त्यांच्या प्रश्नांची चर्चा व मांडणी करायचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या बरोबर राहून त्यांच्या बदलणाऱ्या कर्मविश्वाची, भावविश्वाची जडणघडण न्याहाळण्याचा प्रयत्न करत आहे. संस्कार, संस्कृती, धर्म, राजकारण, समाजकारण, माध्यमं असे अनेक विषय घेऊन त्याची त्यांना समजेल व महाराष्ट्रातल्या समाजाला कळेल, अशा पद्धतीने मांडणी करण्याचा प्रयत्न या आधीच्या अंकांतून आम्ही केला. हा प्रयत्न इथूनपुढेही असाच राहील. महाराष्ट्रासारख्या विशाल प्रदेशातील सर्वच स्त्रियांसाठी सगुणा बांधील आहे, पण त्याबरोबरच अनेक मर्यादांचीही जाणीव होतेय! तीन महिन्यांतून निघणारा अंक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचवण्याचा प्रयत्न चालूच आहे. प्रादेशिक भेदांच्या पलीकडे जाऊन महाराष्ट्रातल्या बहुजन स्त्रियांचं जीवनविश्व सर्वांना कळावं यासाठी शक्य तितके त्या त्या प्रादेशिक भागातील संदर्भ, विषय, समस्या आणि साहित्य 'सगुणा'तून देण्याचा आमचा प्रयत्न होता. तो काही अंशी का असेना सफल होतो आहे. बहुजन स्त्रीविश्वाला विचारांनी समृद्ध होण्यासाठी केला जाणारा प्रामाणिक प्रयत्न म्हणजे 'गुणांसह सगुणा.'

या अंकात प्राथमिक पातळीवर स्त्री-पुरुषांच्या, विशेषत: स्त्रियांच्या मानसिकतेला समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. शरीर आजारी पडतं तसं मनही आजारी पडतं हे स्वीकारण्यात अजूनही आपल्या समाजाला अनेक मानसिक अडचणी आहेत.

आधुनिक काळात म्हणजे आपल्यावर इंग्रजांचे राज्य सुरू झाल्यापासून हळूहळू गेल्या हजारो वर्षांत भारतीय समाजाने विकसित केलेली सगळीच शास्त्रं पाश्चिमात्य कल्पनांना बाजार उपलब्ध झाला पाहिजे यासाठी कालबाह्य, मागासलेली म्हणून टाकाऊ ठरवली गेली.

सातवं शतक ते नववं शतक पुष्यमित्र शुंग ते शंकराचार्य यांच्या काळात बौद्धांचे व बौद्ध धम्माचे उच्चाटन करण्याच्या नादात बुद्धापासून धम्मकीर्तीपर्यंत विकसित झालेले भारतीय मानसशास्त्र त्या आधीच कालबाह्य ठरवले गेले होते. शंकराचार्यांनी विश्वाचं अस्तित्व मायावी ठरवून मनाला पडणाऱ्या प्रश्नांवर शेवटचा पूर्णविराम दिला.

इंग्रजांनी आणलेल्या पश्चिमाभिमुख बाजारकेंद्रीत उत्पादनव्यवस्थेने संपूर्ण आशियाई समाजामध्ये विशेषत:

# सगुणा
## संपादकीय



भारतीय उपखंडामध्ये समाजाच्या व्यक्ती म्हणून व समूह म्हणून अशा दोन्ही पातळ्यांवर अनेक मानसिक गुंते उभे केले. नव्या इंग्रजीव्यवस्थेने आधीच उत्पादनप्रक्रियेचा भाग नसलेल्या ब्राह्मण, सारस्वत, कायस्थ, स्वत:ला क्षत्रिय समजणाऱ्या वतनदार घराण्यातील स्त्रियांना वेगाने अकुशलीकरणाकडे व मादीकरणाकडे नेले. या संक्रमणाने निर्माण झालेले मानसिक गुंते समजावून घेणे तर दूरच, त्याची दखलसुद्धा घेतली गेलेली नाही. आधुनिक पाश्चिमात्य मानसशास्त्र व मानसोपचार तज्ज्ञांनी युरोपियन समाजाचे मानसशास्त्रीय निकष वापरून येथील मनोव्यापार समजावून घेण्याचा 'उद्योग' केलेला आहे. जिथे सभ्रांत, कुलीन, उच्चवर्णीय, उच्चवर्गीय स्त्रियांच्या मनोव्यापाराची दखल घेण्याबाबत ही परिस्थिती असेल तिथे शूद्र, अतिशूद्र, भटक्या-विमुक्त, अस्पृश्य ठरवल्या गेलेल्या उत्पादक, वाहतूकदार, मच्छिमार, हेरगिरी करणाऱ्या, बांधकाम व्यवसायाशी निगडित अथवा सेवेकरी जातीतील स्त्री-पुरुषांची भांडवलशाहीने लादलेल्या अकुशलीकरणामुळे निर्माण होत असलेल्या मनोव्यापारातील गुंत्यांचे, आजारांची नोंद घेणे फारच दूरची गोष्ट आहे.

बहुसंख्य मानसोपचार स्त्री-पुरुष तज्ज्ञ उच्चवर्णीय असून देखील त्यांना त्यांच्या जात-वर्ण-वर्गातील स्त्री-पुरुषांच्या मनोव्यापारात भांडवलशाहीने लादलेल्या संक्रमणाचे काय परिणाम झाले, याची नोंद घेणे देखील शक्य झालेले नाही.

या अंकात आम्ही या मुद्द्यांच्या अनुषंगाने काही लेखन देण्याचे प्राथमिक स्वरूपाचे प्रयत्न केलेले आहेत. शरीर आणि मन हे निरोगी असणे माणसाच्या जगण्याला अर्थ देऊन जातं. शरीर-मन यासाठी एकमेकांवर अवलंबूनही असतं. चिडचिडणारं आजारी मन शरीराकडे केलेल्या दुर्लक्षामुळे परिणाम भोगतं; तर मनाकडे दुर्लक्ष केले, सतत त्याला नाकारत आलो तर शरीराद्वारे ते लक्षणं दाखवतच राहतं.

कित्येकदा चुकीच्या मनोभूमिकेमुळे माणसाला तणावग्रस्तता येते आणि अविवेकी वागण्यामुळे आजार उत्पन्न होतात. मानसिक ताकदच माणसाला लढण्याचं बळ देते. जगण्यातील दु:ख व ताण-तणाव दूर करणे, हे आपल्याच हातात आहे. परिस्थिती आपोआप बदलत नसते. त्यासाठी आपणच विचार करून निर्णय घेतले पाहिजेत. प्रयत्नांनी आपली मन:स्थिती खंबीर बनवली



पाहिजे. आपण आपल्या शरीराचा आवाज ऐकला पाहिजे, कारण शरीर मनाचा आरसा असतो. निसर्गातून निर्माण झालेली प्रत्येक व्यक्ती वेगवेगळी घडलेली असते. आपलं वेगळेपण ओळखलं पाहिजे, जपलं पाहिजे, स्वीकारलं पाहिजे. समाजातून काय घ्यायचं, हे आपण ठरवलं पाहिजे. आत्मविश्वासावरची पकड कधीही ढिली होऊ द्यायची नाही. व्यवस्था तुम्हाला काय देते हे महत्त्वाचे नाही, तर तिने काय द्यायला पाहिजे, हे आपण ठरवणे जास्त योग्य!

विशाल जीवन सतत वाहतं राहणं गरजेचं आहे. त्यासाठी मन अनुकुल बनवा. आपला स्वभाव आपल्याला नीट कळून घेतला पाहिजे व त्यातला आपल्याला व दुसऱ्यांना टोचणारा काटा आपणच काढला पाहिजे. त्यासाठीची तयारी हवी. सतत वाहणारं जीवन बदलांना भेटवतंच. आपल्याला तर बदलांबरोबर जुळवून घेतलं पाहिजे. तणाव दूरच राहतील. जगण्याचं योग्य भान व जबाबदारी, तसंच ज्ञानाचं सान्निध्य तणावावर मात करेल. जोपर्यंत जगणं आहे, तोपर्यंत आपण सगळं ठरवू शकतो. त्यामुळे क्षुल्लक कारणांसाठी जगणं तणावग्रस्त न करता शांतपणाने नियोजन करून जगण्याचा मार्ग रेखला पाहिजे. त्यासाठी उपयोगी पडणाऱ्या गोष्टींची मदत घेतली पाहिजे. आधुनिक जगाने लादलेली निरर्थक प्रतिष्ठेची संकल्पना तपासून आपले श्रम, आपला सभोवताल, आपला आहारविहार, आपल्या आस्था, श्रद्धा यांच्याशी आपली गुंफण न्याहाळून सुरळीत ठेवली पाहिजे. आपलं जग आपल्याशी व आपण त्याच्याशी अनुकूल असणं, यामध्ये येणाऱ्या गोष्टी कशा टाळता येतील, हे पाहिलं पाहिजे. सतत दुसऱ्याच्या आहारी न जाता बरं-वाईट, चूक-बरोबर याचा विचार विषमता टाळून केला पाहिजे. कला, साहित्य, संगीत, छंद, यांचा विचार आपल्या मन:स्थितीसाठी केला पाहिजे. राग, द्वेष, मत्सर, मोह, मद, माया या षड्रिपूंबरोबरच 'प्रेम' नावाची एक गोष्टही आपल्या हृदयात-मनात असते. त्याचाही उपयोग जगणं आनंददायी होण्यासाठी करून बघावा.

त्या सहा रिपूंसोबतच प्रेमाचाही स्वीकार करावा. दुसऱ्यावर राग, द्वेष, मत्सर या सगळ्यांबरोबर प्रेमाचाही प्रयोग करून बघावा. कशातून आनंद अधिक मिळेल तेही पाहावं. स्वत: इतकाच दुसऱ्याचाही आदर करावा, समजून घ्यायचा प्रयत्न करावा.

व्यवस्था तुमचं शरीर व तुमचं मन यामध्ये अंतर ठेवण्याचा प्रयत्न करत असते. कारण त्यांचा बाजार त्यावरच उभा आहे. आपण या दोघांमध्ये अद्वैत करूया.

■



# बहुजन न्यूनगंड

कॉ० विलास सोनवणे

आपण ज्यांना वेगवेगळ्याप्रकारचे गंड म्हणतो (अहंगंड, न्यूनगंड, भयगंड वगैरे) त्याचं भांडवलशाहीमधलं स्वरूप, त्याचं इंडस्ट्रियल सोसायटीमधलं स्वरूप आणि शेती केंद्रित उत्पादनव्यवस्थेमधलं त्याचं स्वरूप हे वेगवेगळं आहे. आपल्याकडे संघटना म्हणून विचार करताना मुळातच कालची समाजव्यवस्था आणि आजची समाजव्यवस्था याच्यामध्ये नेमका काय बदल आणि काय फरक झालेला आहे, हे कधी कुणी विचारात घेतलंय अशी परिस्थिती नाही. लेनिनच्या (लेनिनच्या पूर्वीचा नव्हे) नेतृत्वामधील युरोपातल्या कम्युनिस्टांनी हा बदल लक्षात घेतला. लेनिनच्या पूर्वीचा युरोपातला कालखंड हा नव्या व्यवस्थेचं तत्त्वज्ञान, नव्या व्यवस्थेची विचारधारा आणि नव्या व्यवस्थेचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन (वर्ल्डव्ह्यू) आणि मग त्यातील भांडवलशाहीचा वर्ल्डव्ह्यू काय, हे समजून घेऊन कामगारवर्गीय वर्ल्डव्ह्यू काय असला पाहिजे- ह्या रचनेच्या अगोदरचा कालखंड आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये मार्क्स आणि एंगल्स (किंवा मार्क्स आणि एंगल्सच्या नेतृत्वामध्ये युरोपातले कम्युनिस्ट) भांडवलशाही समजून घेत, तिला प्रतिक्रिया देत, तिचं विश्लेषण करत आणि त्याला काउंटर करणाऱ्या 'वर्ल्डव्ह्यू-तत्त्वज्ञान-विचारधारा' अशा तिन्ही महत्त्वाच्या गोष्टी निर्माण करताना आपल्याला दिसतात. आता भांडवलशाही आल्यानंतरचा नव्या व्यवस्थेचा हा जो युरोपकेंद्रित वर्ल्डव्ह्यू आहे, त्याच्या आधाराने काम करणाऱ्या संघटनेचं स्वरूप काय असलं पाहिजे? असा एक प्रश्न आहे. युरोपमधली जुनी सरंजामशाहीची (feudalism) व्यवस्था आणि नवी भांडवलशाहीची व्यवस्था यात संघटनात्मक संरचनांमध्ये काही बदल झाला आहे काय? तर तो गंभीरपणे झाला आहे. सरंजामशाहीमध्ये राजा, सरंजामदारवर्ग आणि चर्चची उतरंड यांचा एक अलायन्स आहे. जो आपल्याला फ्रान्ससारख्या व इतर युरोपीय देशांमध्ये दिसतो. व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्त्व नावाची गोष्ट फक्त या क्लासमधल्या लोकांनाच माहिती आहे. बाकी नुसता टॉयलिंग मास- कष्टकरीवर्ग आहे. मग तो वेठीस धरलेला शेतमजूर (serf) असेल, कुळं असतील की ज्यांना व्यक्तित्व नाहीय. यात स्त्रियांची तर गणतीच नाही. म्हणजे कष्ट करणाऱ्या पुरुषाला 'कष्ट करणारा पुरुष' असं तरी एक किमान व्यक्तिमत्त्व - आयडेंटिटी आहे. परंतु स्त्रीला ओळखच नाही. याच्या ऐवजी भांडवलशाहीतली परिस्थिती आहे.

युरोपमधला भांडवलदारवर्ग हा सरंजामशाहीला पराभूत करून सत्तेवर आलेला होता आणि तसा आलेला असल्यामुळे तो 'जेता' होता. जेता असल्यामुळे त्याला जिंकण्याचा गंड असेल, पण जुन्या व्यवस्थेने दिलेला कोणताही गंड त्याच्याकडे नाही. ते त्यानं उखडून टाकलेलं आहे.

या भांडवलदारवर्गानं संसद (parliament) नावाची गोष्ट आणली. भारतीय संसदीय परंपरा इंग्लंडकडून घेतलेली आहे, असं आपण म्हणतो, पण ते काही फारसं खरं नाही. भांडवलशाहीची सुरुवात ही प्रामुख्यानं इंग्लंडमध्ये झालेली दिसते आणि या भांडवलशाहीच्या प्रगतीचं अत्युच्च टोक हे अमेरिकेमध्ये गाठलेलं आपल्याला दिसतं. भांडवलशाहीच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर, त्या त्या राष्ट्रामध्ये सरंजामशाहीच्या विरोधात चळवळी किती प्रखर होत्या याच्या आधाराने त्या त्या ठिकाणच्या संसदीय पद्धतीमध्ये बदल झालेले दिसतात. पण सगळीकडे

संसद आहे. त्या संसदेचं नाव कुठं सिनेट असेल, कुठं काँग्रेस असेल, अप्पर हाऊस असेल, लोअर हाऊस असेल, पण आहे ती पार्लमेंटच- संसदीयप्रणालीच. त्या प्रणालीमध्ये निवडून येण्याच्या प्रक्रिया युरोपीय राज्यांमध्ये वेगवेगळ्या आहेत. इंग्लंडमध्ये डायरेक्ट व्होटिंग सिस्टम आहे. सिंपल मेजॉरिटी सिस्टिम आहे. जर्मनीमध्ये प्रपोर्शनिट व्होटिंग सिस्टिम आहे. फ्रान्समध्ये वेगळ्याप्रकारची अध्यक्षीय पद्धती आहे, पण तो अध्यक्ष सार्वभौम नाहीय, तर त्याच्यावर संसदेचा अंकुश आहे. अमेरिकेचा अध्यक्ष सार्वभौम आहे. त्याला संसदेकडून बजेट पास करून घ्यावं लागतं. त्याच्यावर संसदेचा अंकुश आहे, पण संसदेनं पास नाही केलं, तर त्याच्याकडे व्हिटो पण आहे. म्हणजे तो सिनेट आणि काँग्रेसची एकत्रित बैठक घेऊन मेजॉरिटी करून त्याला हवं तसं सगळं करू शकतो. अशा वेगवेगळ्या पद्धती असल्या तरी पण संसद आहे. त्यामुळे संसदीयप्रणाली आहे असं आपल्याला सरधोपटपणे म्हणता येत असलं, तरी पण ही 'जेत्यां'ची संसद आहे. भारतीय संसद ही जेत्यांची संसद नाही, हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे.

संसद सोडली तर न्यायव्यवस्था (judiciary), नोकरशाही (bureaucracy), सैन्य (military) यांच्या रचना ह्या चर्चच्या धर्तीवर आधारलेल्या आहेत. चर्चचं केडर असतं व त्यामध्ये ब्रदर, फादर, रेव्हरंड, बिशप, आर्चबिशप, कार्डीनल आणि पोप अशी उतरंड असते. तशीच नोकरशाहीमध्येही हायरारकी आहे- उदा० प्रथम श्रेणी-द्वितीय-तृतीय-चतुर्थ-सुपर श्रेणी इ०. असंच न्यायव्यवस्था, सैन्यामध्येपण आहे. ह्या रचनांना काउंटर करणाऱ्या रचना नव्या भांडवलदारवर्गानं उभारलेल्या दिसत नाहीत. ज्यावेळेला भांडवलशाहीला विरोध करणारा वर्ल्डव्ह्यू मार्क्स-एंगल्स वा कम्युनिस्टांनी रचला त्या वर्ल्डव्ह्यूच्या आधाराने संघटना कशी बांधायची, याची चर्चा लेनिनपूर्व काळात झालेली दिसत नाही. या सगळ्या चर्चा आपल्याला लेनिनच्या काळात दिसतात.

१८७० साली पॅरिस कम्युन झालं. त्याच्या आधी मार्क्स-एंगल्स व युरोपातले कम्युनिस्ट आपल्याला एवढंच सांगतात की 'ही व्यवस्था समूळ नष्ट केली पाहिजे.' म्हणजे काय केलं पाहिजे? 'पॅरिस कम्युनचा लढा आणि त्याचे धडे' असं मार्क्सचं एक सुंदर पुस्तक आहे. त्यात पहिल्यांदा पॅरिस कम्युन स्थापन करताना फ्रान्सच्या कामगारांनी काय काय चुका केल्या, याची नोंद मार्क्स घेतो. ही नोंद घेताना काय काय टाळलं पाहिजे, हेही सांगतो (आजचा आपला विषय हा नाही, पण आपण हे सगळं नीट वाचलं पाहिजे). त्याच्याच आधाराने पुढे कम्युनिस्ट पक्षाची रचना कशी असली पाहिजे, याची चर्चा लेनिन करतो आणि ह्या आधाराने बोल्शेव्हिक कम्युनिस्ट पक्ष बांधला जातो. बोल्शेव्हिक कम्युनिस्ट पक्ष हा क्रांती यशस्वी करणारा जगातला पहिला कम्युनिस्ट पक्ष असल्यामुळे नंतरच्या काळात जगातल्या सगळ्या कम्युनिस्ट पक्षांनी बोल्शेव्हिक कम्युनिस्ट पक्षाची रचना जशास तशी स्वीकारली, मात्र त्याची चर्चा नाही केली, हे इथं पहिल्यांदा नमूद केलं पाहिजे.

अगोदर मी म्हटलं तसं युरोपिय भांडवलदारवर्गानं सरंजामशाहीला पराभूत करून 'जेता' म्हणून सगळी सत्ता ताब्यात घेतलेली आहे आणि ते करताना त्यानं सरंजामशाहीचं काही शिल्लक ठेवलेलं नाही. तिच परिस्थिती आपल्याला रशियन आणि चिनी क्रांतीनंतर दिसते. तिथल्या कामगारवर्गानं कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली 'जेता' म्हणूनच सत्ता ताब्यात घेतली. त्यामुळं तिथं कुठं न्यूनगंडाचा प्रश्न आलेला नाही. भांडवदारवर्ग असेल, नंतर कामगारवर्ग असेल दोघेही आपापल्या क्रांत्या करतात. आपापल्या शत्रूंना पराभूत करून ते सत्तेवर आलेले आहेत. त्यामुळे असलाच तर जिंकण्याचा अहंगंड असू शकतो. पण कुठल्याही प्रकारच्या न्यूनगंड वा भयगंडाचा मुद्दा तेथे नाही.

आपल्याकडं नेमकं काय दिसतं? तर भांडवलदारांनी सरंजामशाहीला पराभूत केलं. ही केवळ एक राजकीय घटना नाही. 'व्यवस्था' असा शब्द आपण वापरतो तेव्हा तो 'समग्र व्यवस्था' असा असतो. आणि 'सत्ता' असा शब्द आपण वापरतो तेव्हा ती केवळ 'पोलिटिकल पॉवर' नसते. ती सरंजामशाहीची पोलिटिकल पॉवर डिफिट करते

आणि सरंजामशाहीच्या 'ज्ञान' म्हणून ज्या समज वा संकल्पना आहेत, त्यांनाही पराभूत करते. युरोपातल्या भांडवलशाहीच्या विकासाची प्रक्रिया ही आपल्याला अठराव्या-एकोणिसाव्या शतकात एकदम पुढे सरकताना दिसते- औद्योगिक क्रांती वगैरे. पण त्याची खरी लढाई जी आहे ती तेराव्या-चौदाव्या शतकामध्ये 'ज्ञान' नावाच्या सत्तेला आव्हान देतच सुरू होते, हे येथे लक्षात घेतलं पाहिजे. त्याची राजकीय परिणिती ही पुढे आपल्याला भांडवलशाही क्रांत्यांमध्ये झालेली दिसते. कामगारवर्गाचंही तसंच आहे. भांडवलशाहीनं प्रस्थापित केलेल्या 'ज्ञानसत्ते'ला आव्हान देत आणि भांडवलशाहीनं ज्ञानाच्या केलेल्या व्याख्या नाकारत कार्ल मार्क्स 'कामगारवर्गाचं ज्ञान' अशा अर्थाच्या व्याख्या आणतो. भांडवलदारवर्गाची ज्ञानसत्ता पराभूत करून 'कामगार-कष्टकरीवर्गाची ज्ञानसत्ता' प्रस्थापित करणे, असा तो अजेंडा आहे.

ह्या अंगाने आपल्याकडे फारशा चर्चा झालेल्या नाहीत. एका 'शोषकां'च्या ज्ञानसत्तेचा पराभव करून 'शोषितां'ची ज्ञानसत्ता प्रस्थापित करणं, असा अर्थ आपल्याकडच्या चळवळींमधून सांगितला जात नाही. सांगितलं एवढंच जातं की- 'राजकीय सत्ता उद्ध्वस्त करायची आहे.' यामुळे 'ज्ञानसत्ते'च्या संदर्भात चर्चाच होत नाही. ज्ञानसत्तेची चर्चा एकोणिसाव्या शतकात प्रथमच महात्मा जोतीराव फुले करताना दिसतात. फुले हा अतिशय द्रष्टा सामाजिक क्रांतिकारक आहे. 'गुलामगिरी'मध्ये फुले जी चर्चा आणतायत त्या चर्चेचं विश्व 'ज्ञानसत्ते'चा मुद्दा हे आहे. पण फुल्यांनंतरच्या काळामध्ये इतर कुठल्याही अब्राह्मणी सुधारकांनी (फुल्यांनंतरच्या काळात अब्राह्मणी सुधारकांनी ब्राह्मणांना शिव्या देण्याचाच उद्योग मोठ्याप्रमाणात केला) प्रस्थापितांची ज्ञानसत्ता पराभूत करून इथल्या बहुजनांची ज्ञानसत्ता प्रस्थापित करण्याबद्दल किंवा तिची व्याख्या कशी करायची, याद्दल चर्चा वा प्रयत्न केलेले दिसत नाहीत. त्यामुळे फुल्यांनंतरच्या काळामध्ये ज्ञानसत्तेचा हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा बाजूला पडला. फुल्यांनी अमुक केलं, तमुक केलं अशापद्धतीनं क्वचित कधी तरी व्याख्यानांमधून त्याचा उल्लेख होतो, इतकंच. पण कोणते मुद्दे बाजूला पडले आणि कोणते पुढे सरकले, हे लक्षात घेतलं म्हणजे आजच्या स्थितिगतीचं आकलन व्हायला मदत होते.

प्रस्थापितांच्या ज्ञानसत्तेला उत्तर म्हणून महात्मा फुले 'शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांची ज्ञानसत्ता' असं 'प्रति-ज्ञान' (काउंटर नॉलेज) उभं करण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा हा 'प्रति-ज्ञान' उभं करण्याचा प्रयत्न मूलगामी आहे. हा मुद्दा फुल्यांनंतरच्या काळात जोरकसपणे पुढे सरकायला हवा होता, पण तसं झालं नाही. यामुळे रिप्लेसमेंट थिअरी प्रभावी झाली. 'ब्राह्मण्य नष्ट करायचं' या गोष्टीकडे कुणाचं लक्ष राहिलं नाही आणि त्या ऐवजी 'ब्राह्मणांची जागा घेणं म्हणजे आपण ब्राह्मण होणं,' हा मुद्दा पुढे जोरात सरकला. फुले जेव्हा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक सत्तेचा विचार करतात, तेव्हा त्या प्रत्येक ठिकाणी ते सत्तेच्या ब्राह्मणी आशयाला, भांडवली आशयाला आणि त्या आशयाच्या आधाराने उभ्या राहिलेल्या रचनेला नाकारत असतात. फुल्यांनंतरच्या काळात सत्तेच्या ब्राह्मणी आशयाचा मुद्दा बाजूला पडून ब्राह्मणी रचनेमध्येच ब्राह्मणांना बाजूला सारून आम्हाला सत्तेवर यायचं, हा मुद्दा पुढे सरकला.

त्याचे दूरगामी परिणाम आज सर्वच क्षेत्रांमध्ये झालेले आहेत. म्हणजे फुल्यांनंतर आता जवळजवळ चारपाच पिढ्या झाल्या. त्या प्रत्येक पिढीतील तथाकथित अब्राह्मणी नेतृत्वाने ज्ञानसत्तेच्या (सत्तेच्या इतर अंगांच्या) ब्राह्मणी आशयाचा मुद्दा विचारात न घेतल्यामुळे जे 'अब्राह्मणी प्रति-ज्ञान' उभं राहायला हवं होतं, ते उभं राहूच शकलेलं नाही. हे प्रति-ज्ञान उभं राहू न शकल्यामुळे इथला बहुजनसमाज शिकण्याच्या नावाखाली केवळ साक्षर होत राहिला. ही साक्षरता ग्रहण करताना त्यानं मूल्य म्हणून जे घेतलं, ते सगळं ब्राह्मणीच राहिलं. मग बहुजन समाजाचा भाग असलेल्या आदिवासी, भटके-विमुक्त, दलित, स्त्रिया असतील यापैकी कुठल्याही चळवळीने प्रति-ज्ञान उभं करण्याचा मुद्दा उपस्थित केला नाही. साक्षर होणं म्हणजे शिकणं असा समज झाला. कळत

नकळत ह्या ब्राह्मणी मूल्यांना स्वीकारल्यामुळे त्यातल्या बहुसंख्य लोकांना असं वाटायला लागलं की, 'मी एवढं सगळं शिकलोय तरी पण हा कुलकर्णी आपल्याला का नाही मानत? मग हटवा त्याला.' अशी ती प्रतिक्रिया आहे. हा अंतर्विरोध आहे.

भारतातील भांडवलशाहीपूर्व काळात खेडं-शेती केंद्रित उत्पादन व जातिव्यवस्था होती. तित शेतीच्या ज्या काही गरजा होत्या, त्यांनुसारच गावांच्या रचना होत्या. शेतीमधील गरजांच्या आवश्यकतेनुसार जातीच्या आणि घरांच्या रचना आपल्याला दिसतात. सामूहिकता हे या शेतिकेंद्रित उत्पादनव्यवस्थेचं चांगलं वैशिष्ट्य होतं. त्यात एका बाजूला प्रत्यक्ष व्यवहारामध्ये- महानुभाव पंथ असेल, वारकरी पंथ असेल, लिंगायत पंथ असेल, सूफी असतील, नाथ पंथीय असतील- ही सगळी संतमंडळी त्या जातिव्यवस्थेमध्ये प्रति-ज्ञान (काउंटर नॉलेज) उभं करताना आपल्याला दिसतात. म्हणूनच त्यांच्यामध्ये न्यूनगंड नावाची भानगड नाहीय. ही सर्व मंडळी बहुजनांची अब्राह्मणी ज्ञानकेंद्रं आहेत. ही मंडळी नुसतं ब्राह्मणी ज्ञान नाकारत नाहीत, तर ज्ञानाची व्याख्याही करतायत. पुढे ब्रिटिश आले आणि या काळात अनेक गोष्टी घडल्या. त्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की बहुजन समाज आपल्या उत्पादनांच्या साधनांपासून हळूहळू तुटत जाऊ लागला. या पार्श्वभूमीवर संतमंडळींचा प्रति-ज्ञानाचा तुटलेला वारसा आणि धागा पुन्हा पकडून एकोणिसाव्या शतकामध्ये महात्मा फुले भांडवली आणि ब्राह्मणी ज्ञानसत्तेला आव्हान देत 'प्रति-ज्ञान' (काउंटर नॉलेज) विकसित करण्याचा प्रयत्न करतात. फुल्यांच्या नंतर महात्मा गांधी काहीप्रमाणात हे प्रति-ज्ञान उभं करताना दिसतात. त्यानंतर मात्र तो धागा पूर्णपणे तुटला तो तुटलाच. त्यामुळे पुढचे आपले सगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत.

आताच्या काळात ब्राह्मणी सत्तेशी भांडण्याचा अब्राह्मणांचा कितीही दावा असला तरी ब्राह्मणांना बाजूला करून त्यांची जागा घेण्याचाच हा केविलवाणा प्रयत्न आहे. त्यामुळे बहुजनांतला यशस्वी कोण? तर जो ब्राह्मणी सत्तेमध्ये यशस्वीपणे आपलं स्थान निर्माण करू शकला/शकली तो/ती. या प्रक्रियेमध्ये 'ब्राह्मण्य' या गोष्टीला धक्काही लागत नाही. कारण श्रेष्ठत्वाच्या आणि कनिष्ठत्वाच्या सगळ्या संकल्पना आणि मूल्यं ही मूलतः ब्राह्मणी आहेत. म्हणजे जन्मानं बहुजन वा ब्राह्मणेतर आणि कर्मानं ब्राह्मण असा हा अंतर्विरोध आहे. हा अंतर्विरोध कुठे तरी तुमच्या नकळत एक मोठी न्यूनगंडाची भावना निर्माण करतो. मग हा न्यूनगंड अतिशय सर्टल (sartell) लेवलवर- तुम्ही कितीही ब्राह्मण व्हायचा प्रयत्न केलात तरीही- ऑपरेट होत राहतो. याचं उदाहरणच द्यायचं झालं तर महाराष्ट्रातील स्वतःला दादा समजणारे सगळे राजकारणी दिल्लीत गेले की तेथे ते 'मनसबदार' होऊन जातात. म्हणजे छत्रपती शिवाजीमहाराज मनसबदार झाले नाहीत. परंतु इथून दिल्लीत गेलेले सगळे आधुनिक 'शिवाजी' दिल्लीच्या सत्तेचे मनसबदार होतात. मग ते यशवंतराव असोत, की शरद पवार असोत, की विलासराव असोत किंवा गोपीनाथ मुंडे असोत. मी काय म्हणतोय ते नीट लक्षात घ्या.

म्हणजे नकळत त्यांनी या व्यवस्थेमध्ये यशस्वीपणे ब्राह्मणांच्या ऐवजी आपलं स्थान निर्माण केलेलं आहे, पण ते करताना कळत नकळत ब्राह्मणी मूल्ये उधार घेतलेले आहेत, असा हा अंतर्विरोध आहे. त्यांच्याकडे स्वतःचं काही ओरिजनल नसल्यामुळे त्यातून आलेला हा न्यूनगंड आहे. आणि हा न्यूनगंड तिथं- दिल्लीच्या सर्वोच्च सत्तेसमोर गेलं की यांना नतमस्तकच करतो. त्यामुळे ह्यांच्यातला उद्या चुकून कुणी पंतप्रधान झाला तर त्या पंतप्रधानकीचा जो कॉन्फिडन्स नेहरू परिवाराला आहे, लालबहादूर शास्त्री, नरसिंह रावांना होता तो ह्यांना असेलच अशी म्हणण्यासारखी काही परिस्थिती नाही.

न्यूनगंडाच्या संदर्भात चर्चा करताना ह्या न्यूनगंडांची उगमस्थानं काय आहेत हे जर समजून घेतलं नाही, तर या व्यवस्थेच्या विरोधातला लढाच उभा करता येत नाही. दुसरी एक गोष्ट घडते ही न्यूनगंड नावाची गोष्ट जर आपण मान्य केली नाही, तिला रिकग्नाईज केलं नाही, तिला ओळखलं नाही तर त्याचा दुसरा आविष्कार अत्यंत

उथळ-उर्मट- अरेरावीच्या अहंगंडामध्ये होतो. अहंगंड ही न्यूनगंडाचीच एक वेगळी अभिव्यक्ती आहे. आणि ब्राह्मणी व्यवस्था अशा उथळ-उर्मट अहंगंड असलेल्यांना नीट मोठं करते. सगळी माध्यमं त्याला व्यवस्थित फ्लॅश करतो. हा न्यूनगंड रिकग्नाईज करून काउंटर नॉलेजची प्रक्रिया चळवळीच्या सर्व स्तरावर उभ्या करणाऱ्या लोकांना जर झाकायचं असेल तर अशा उथळ लोकांना मोठं करणं ही व्यवस्थेची गरज असते. पण ह्यांना असं वाटतं की आपण चळवळीला रेटा दिलेला आहे म्हणून तीच आपल्याला मोठं करतेय. वास्तविक खरं म्हणजे व्यवस्थेला साधा ओरखडाही उठत नाही. त्यातून एवढंच होतं की आक्रोश तेवढा बाहेर पडतो. आक्रोश या व्यवस्थेमध्ये दबून राहणं व्यवस्थेला नको असतं. तो जर अशा उथळ लोकांमुळे बाहेर पडत असेल आणि सेफ्टी वॉल म्हणून जर ते काम करत असतील तर ह्यांना मोठं करण्यात व्यवस्थेला फायदाच फायदा आहे.

थोडंसं मागे गेलो म्हणजे हरितक्रांतीमुळे जी कॅशक्रॉप सिस्टिम आली त्यामुळे मधल्या वीस-पंचवीस वर्षांच्या काळात प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या जातींमध्ये जी अरेरावी आली - ती अरेरावीही जरा नीट समजून घ्या - ती अरेरावी पण अशाच उथळ न्यूनगंडाचा आविष्कार होता. अशा लोकांना व्यवस्थेनं पद्धतशीरपणे त्या त्या टप्प्यावर मोठं केलेलं आहे. उदाहरणार्थ- वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक इत्यादी. त्या त्या टप्प्यावर व्यवस्थेनं कोणा कोणाला मोठं केलं आहे हे जरा नीट बारकाईनं लक्षात घेतलं की समजतं. हे सगळे कृत्रिमरीत्या अरेरावी आलेल्या त्या वर्गाचे प्रतिनिधी आहेत. शालिनीताई पाटील असतील. महाराष्ट्रात मराठाच कसा मुख्यमंत्री झाला पाहिजे, याची त्यांनी वकिली केली, ती कशाच्या जिवावर? तर फक्त चार टक्के ऊस उत्पादक महाराष्ट्रातील ऐंशी टक्के पाणी पळवत होता आणि ते पाणी पळवण्याची ताकद ज्या वर्गामध्ये होती त्या वर्गाची ती अरेरावी होती. फक्त इरिगेटेड (irrigated) भागामध्येच ऊस येतो. आजही महाराष्ट्रामधला इरिगेटेड भाग तीस-पस्तिस टक्क्यांच्या वर गेलेला नाही. आता तर इरिगेटेड भागाचंच मोठ्याप्रमाणात शहरीकरण झालेलं असल्यामुळे ते क्षेत्र म्हणून कमी होत चाललं आहे.

ती जी अरेरावी करणारा वर्ग होता त्याची जागा आता जमिनी विकून पैसे आलेला जो वर्ग आहे, तो घेतोय. हे त्या त्या काळातले दोन्ही माज आणि चळवळ म्हणून माजल्यासारखे दाखवणारे लोक यांच्या माजाच्या क्वॉलिटीमध्ये फारसा फरक नाही. ह्या वर्गाचा खरा प्रॉब्लेम 'ज्ञानाचा न्यूनगंड' हा आहे. ज्ञानसत्तेबद्दलचा न्यूनगंड आहे. म्हणजे कालपर्यंत हरितक्रांतीमुळे जो मोठा झालेला होता तो 'किमान तू शिकलायस' म्हणून नमस्कार तरी घालत होता. परंतु आता जमिनी विकून ज्याच्याकडे पैसा आलेला आहे तो असं मानतो की ''अरे पैसे देऊन शिकलायस तू आणि शिकायला जेवढे पैसे तू दिलेस त्यापेक्षा जास्त पैसे माझ्याकडे आहेत की. मी सोन्याचा शर्ट शिवतो की लेका. तू शिकून असा शर्ट शिवू शकतोयस का?'' थोडक्यात कालपर्यंत किमान हरितक्रांतीमुळे माज आलेल्या वर्गातील जमिनीपासून ॲलियनेट होणारा तरुण बापानं/सासऱ्यानं काढलेल्या संस्थेमध्ये पैसे न देता शिक्षक/प्राध्यापक तरी होत होता. कॉम्प्रमाईजची लेवल म्हणून त्याला फार फार तर संस्थाचालकाच्या पोरीशी लग्न करावं लागत होतं. विशेषतः मराठवाड्यात हा प्रकार खूप होता. आता हे सगळंच बदललं आहे. ही सगळी जी अरेरावी येतेय त्या अरेरावीमध्ये- मघाशी मी जो उल्लेख केला - त्या अंतर्विरोधाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. कारण तुम्ही साक्षर आहात.

आता असं झालं आहे की सर्व काही एका स्थितिवादी परिस्थितीला (स्टॅगनसी लेवल) पोहचलेलं आहे. पूर्वी ब्राह्मणी-भांडवली चौकटींमध्ये जोपर्यंत माणसाला कुठेतरी पुढे जाण्याचा स्कोप होता. पण आता तो स्कोप संपलेला आहे. आज आपण याला चॅलेंज करू शकतो, कारण आता ती स्थितीवादी परिस्थिती ( स्टॅगनसी सिच्यूवेशन) आलेली आहे. आता तुमच्या केवळ साक्षर असण्याला कोणी विचारत नाही. ही साक्षरता तुम्हाला सोन्याचा शर्ट देत नाही. ही साक्षरता तुमच्याकडे पैसे नसतील तर शाळा-कॉलेजचं तोंडही पाहू देत नाही. शिक्षण जसं

इंडस्ट्रिमध्ये कन्व्हर्ट झालं, तसा साक्षरतेचा मुद्दाही आता गौण व्हायला लागला आहे. म्हणजे साक्षरता आता ह्या न्यूनगंडाची कॉन्टिटी आणि क्वॉलिटी वाढवते आहे, कारण एकप्रकारची अगतिकता आता आलेली आहे. उदाहरणार्थ, मी एमए झालो, पुढे काय? तर मी एम फिल झालो, पुढे काय? तर मी पीएच डी झालो, पुढे काय? सेट-नेट झालो, पुढे काय? नोकरी पाहिजे पण वीस लाख रुपये नाहीत, पुढे काय?... म्हणजे माझ्याजवळ वीस लाख रुपये असतील तरच एमए, एमफिल, पीएचडी, सेट-नेट वगैरेला काही अर्थ आहे, आणि ते नसतील तर यू आर फिनिश्ड...याचा दृश्य परिणाम म्हणजे हतबलता येणं. ती हतबलता मूळातला जो न्यूनगंडाचा मुद्दा आहे त्याचा मोठ्याप्रमाणात गुणाकार करते.

ज्यांना ज्यांना ही परिस्थिती मान्य नाही त्यांनी संघटना उभारताना हा सर्वांत महत्त्वाचा फॅक्टर म्हणून विचार केला पाहिजे. म्हणून संघटना महत्त्वाची की व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचं या प्रश्नाला आपण जर न्यूनगंडाच्या ह्या फ्रेममध्ये तपासायला सुरुवात केली तर काय दिसतं? तर व्यक्तिस्वातंत्र्य नावाची गोष्ट केवळ कागदावर राहते, संघटनेच्या घटनेमध्ये राहते. आणि संघटनेचं नेतृत्व जर ब्राह्मणी जातवर्गातून आलेलं असेल किंवा जरी संघटनेच्या घटनेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य असलं तरी प्रत्यक्षात तुम्ही 'दास' (स्लेव्ह) म्हणूनच राहता. कारण तुम्ही हे मान्य केलेलं असतं की 'ते' ज्ञानकेंद्र आहे आणि 'त्यालाच' सगळं कळतं, आपल्याला कुठं काय कळतं. मग क्रांती ही तुमची गरज असली तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये ती केवळ भावना बनते. ती भावना तुम्हाला अधिकाधिक डॉग्मॅटिक- पोथिनिष्ठ आणि पूर्णपणे असंवेदनक्षम बनवत जाते. म्हणजे त्या विरोधात तुम्ही काही ऐकून घ्यायला तयार नसता. यात ज्यासाठी म्हणून तुम्ही ती संघटना उभी केलेली असते तो मुद्दा-उद्देशच बाजूला पडत जातो. संघटनेच्या ताब्यात जर सत्ता येणार असेल तरच परिवर्तन होईल, अशी अट तुम्ही घालता.

या परिप्रेक्ष्यामध्ये काय केलं पाहिजे? संघटनेचं नेतृत्व केवळ ब्राह्मणी जातवर्गातून आलंय की नाही आलंय एवढंच बघून चालणार नाही. म्हणजे ते ब्राह्मणांतून आलेलं असेल आणि ते जर काउंटर नॉलेजच्या बाजूनं कमिटेड असेल तर मग व्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा वेगळा होईल. पण ते अब्राह्मणी जातवर्गातून आलेलं असेल आणि त्याच्या नेणिवेमध्ये जर हे सगळे न्यूनगंड असतील, हे ब्राह्मण्य असेल तर ते पाठांतरवादी होईल. पाठांतरवादाचीही एक शोकान्तिका असते, उदा० तुम्ही मार्क्स पाठ केला असेल, तर मार्क्सला जाऊन आज दोनशे वर्षं झाली. तो कितीही ग्रेट असला तरी त्यानं दीडशे वर्षांपूर्वी त्याच्या भौतिकतेचं केलेलं ते विश्लेषण आहे, हा विचार पाठांतरामुळे बाजूला पडतो आणि मार्क्सने कोणत्या पानावर, कोणत्या ओळीत काय लिहिलंय- त्याचं कोटेशन महत्त्वाचं होऊन बसतं. अशा गोष्टींना महत्त्व देणाऱ्या संघटना ह्या व्यवहारामध्ये भौतिकवादी राहत नाहीत. कारण भौतिकतेपासून त्या पूर्णपणे तुटलेल्या असतात. त्या संघटना आहेत, त्या परिवर्तनवादी असल्याचा त्यांचा दावाही आहे आणि स्वतःला समाधानी ठेवण्यासाठी, कार्यकर्त्यांना सक्रीय ठेवण्यासाठी ते काही ना काही उद्योगही करतच असतात. त्यांची भाषा विरोधाची असते, पण त्यातून विरोध निर्माण होत नाही, तर फक्त विरोधाचा भास निर्माण होतो.

आपल्या देशात बहुसंख्य व्यवस्थेला विरोध करण्याचा दावा असणाऱ्यांची अडचण आता ही आहे. भांडवलशाहीचं सगळ्यात व्यवच्छेदक लक्षण काय आहे? भांडवलशाही गेली दीडशे वर्षं सगळ्यात मोठं हत्यार म्हणून दोन गोष्टी वापरतेय. एक : ॲलिनेशन- बेमूळ करणं...डि-फेस करणं. दोन : आभास. हे डि-फेस तुमचं समाजापासूनचं तुटलेपण पक्कं करत जातं. उदा० एखाद्या पन्नास मजली बिल्डिंगमध्ये पाचहजार लोक राहत असतील. पण त्या पाचहजारातला प्रत्येकजण इंडिव्हूजवल असतो. स्वतंत्र असतो. त्या एका माणसाचा माणूस म्हणून आणि मानवी समाज म्हणून उरलेल्या चारहजार नऊशे नव्व्यान्नव लोकांशी काहीच संबंध नसतो. एखाद्या फ्लॅटमध्ये एखादी व्यक्ती मरण पावली तर दुसऱ्या फ्लॅटमधल्या लोकांना ते कळतसुद्धा नाही. किंवा

मरण्यापर्यंत ती व्यक्ती आजारी तरी केव्हा पडली हेही माहीत नसतं. ॲलिनेशन.

याच्या तुलनेत आपण शेती केंद्रित गाव पाहू या. कालच्या भारतातील शेती केंद्रित गावातील कुठल्याही एका माणसाचं दुःख हे त्या संपूर्ण गावाचं दुःख होतं. आता असं सामूहिकत्व राहिलेलं नाही. आताचा ॲलिनेटेड माणूसच आज समूहकत्वाचा आभास निर्माण करणाऱ्या विविध उत्सवांमध्ये प्रचंड प्रमाणात सामील होतो आहे. ॲलिनेशन जस जसं वाढत चाललंय तस तशी उत्सवांमधील गर्दी वाढत चाललीय. त्या गर्दीमध्ये तुमचं सगळं- जे आत दाबलं गेलेलं असतं ते सगळं- बाहेर काढता येतं. तिथं तुम्हाला कोणीही जाब विचारणारं नसतं. कारण विचारणाऱ्याला 'मी देवाला गेलो होतो आणि तू असं कसं विचारतोस' असं म्हणण्याची सोय असते. म्हणजे सगळीच आभासी भानगड आहे.

आता प्रत्येक व्यक्ती दोन प्रकारच्या गोष्टींतून जात आहे. एक : ॲलिनेशन- तुटलेपणातून जात आहे. दोन : आभास. सगळ्या क्षेत्रांत एकप्रकारची स्टॅग्नसी आलेली आहे आणि ती कुठेतरी तिला अगतिकतेची जाणीव करून द्यायला लागली आहे. ज्यांना ही अगतिकतेची जाणीव होते आहे, ते आपल्याकडे येताहेत.

म्हणून अशा व्यक्तीला आपण काय करायला लागेल? वारकरी आणि इतर संप्रदायांनी त्यांच्या काळातलं प्रति-ज्ञान (काउंटर नॉलेज) उभं करण्याचं काम केलं होतं. फुल्यांनी त्यांच्या काळातलं काम केलं; मार्क्सनं त्याच्या काळातलं काम केलं. तेव्हा फुल्यांच्या नंतर तुटलेला हा प्रति-ज्ञानाचा (काउंटर नॉलेज) धागा आज आपल्याला पुन्हा पकडावा लागेल आणि प्रति-ज्ञान (काउंटर नॉलेज) उभं करावं लागेल. प्रति-ज्ञान म्हणजे प्रतिबिंब नव्हे, याचंही भान ठेवावं लागेल. कारण आपल्याकडे बऱ्याच वेळेला प्रतिबिंब म्हणजे प्रति-ज्ञान असं मानण्याची प्रवृत्ती आहे.

शेती केंद्रित उत्पादनव्यवस्था आता संपलेली आहे. तेव्हा आता जर आपण शेती केंद्रित उत्पादनव्यवस्थेचे गोडवे गायला लागलो तर आपण दोनशे वर्षं मागं गेल्यासारखं होईल. या स्थितीत उपलब्ध असलेल्या आधुनिक साधनांसकट आपणाला सामूहिकतेचा मुद्दा केंद्रस्थानी आणावा लागेल. तो मुद्दा केंद्रस्थानी आणताना व्यक्तींचं स्वातंत्र्य दडपलं जाणार नाही याची काळजी आणि हमी- दोन्हीही घ्यावी लागेल. कारण कालच्या शेती केंद्रित जातिव्यवस्थेमध्ये व्यक्तीचं स्थान पाहायचं म्हटलं तर व्यक्ती ही संकल्पनाच नव्हती. मास आहे. व्यक्ती ही खूप दुय्यम गोष्ट होती. म्हणजे तुम्हाला व्यक्तीच व्हायचं असेल तर मग तुकाराम, शिवाजी वगैरे झालं पाहिजे. तुकाराम आणि शिवाजी होणार नसाल तर व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात? असा प्रश्न उरतोच. प्रत्येक व्यक्तीला तिचं व्यक्तित्व दडपलं जाणार नाही याची हमी द्यायला लागेल आणि ती देत असताना त्या व्यक्तीनंही हे लक्षात ठेवलं पाहिजे, की आपण सामूहिकत्वापासून तुटलो तर ॲलिनेशनमध्ये जाऊ. सामूहिकत्व ही व्यक्तिस्वातंत्र्य जपण्याची पूर्व अट आहे, असं व्यक्तींनी मानलं तर हा तिढा सुटेल. परंतु ही गोष्ट केवळ आपल्या कल्पनेत आली म्हणून करता येत नाही. तर तशाप्रकारच्या उत्पादनव्यवस्थेला जन्म द्यावा लागेल. तसा जन्म देताना आताचा तंत्रज्ञानाचा आणि विज्ञानाचा विकास न रोखता त्याच्यातली नफा नावाची गोष्ट बाजूला काढावी लागेल. आणि विश्वाचा ऱ्हास न करता मानवी समाजाला केंद्रस्थानी ठेवून ती प्रकृतिपूरक कशी होईल, हे पाहावं लागेल. याशिवाय दुसरे कुठलेही शॉर्टकट्स आज जगामध्ये शिल्लक राहिलेले नाहीत.

■

# महिलांच्या राखीव जागांचे राजकारण

डॉ० वैशाली पवार

राजकारण हे सार्वजनिक क्षेत्र मानले गेले. स्त्रीचे कार्यक्षेत्र कुटुंबापुरते मर्यादित, तर पुरुषाचे कार्यक्षेत्र कुटुंबाच्या सीमाक्षेत्राच्या बाहेर समाज हे मानले गेले. या अशाप्रकारच्या विभागणीतूनच महिलांना राजकारणात समान संधी, समान राजकीय सहभाग व समान राजकीय सत्ता नाकारली जाते. महिलांना पुरुषांप्रमाणे समान राजकीय प्रतिनिधित्व देण्यासाठी राखीव जागांची मागणी सतत केली जाते. ही मागणी निव्वळ महिलांच्या राजकीय अधिकारापुरती मर्यादित राहत नाही, तर त्या आधारे हितसंबंधांचे राजकारण पुढे रेटण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**महिलांच्या राखीव जागा**

राजकीय नेतृत्व आणि प्रतिनिधित्व या दोन क्षेत्रामध्ये महिलांचे स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. याची जाणीव १९७५ मध्ये प्रथम झाली. 'टुवर्डस् इक्वॅलिटी' हा अहवाल १९७५ मध्ये प्रसिद्ध झाला. या अहवालात स्थानिक शासन संस्थांमध्ये राखीव जागा महिलांसाठी द्याव्यात, अशी मागणी केली होती. त्यानंतर जवळजवळ पंधरा वर्षांनी प्रत्येक घटक राज्यात महिलांसाठी राखीव जागा कायदेशीरदृष्ट्या मान्य करण्यात आल्या. नव्वदीच्या दशकात स्थानिक शासन संस्थेमध्ये महिलांचे राजकारण घडू लागले. गेली २३-२४ वर्षे स्थानिक शासन संस्था हीच महिला राजकारणाची मध्यभूमी म्हणून आकाराला आली आहे. सुरुवातीला ३०% नंतर ३३% आणि सरतेशेवटी ५०% अशा क्रमाने स्त्रियांच्या राखीव जागाचा विस्तार झाला. यामुळे स्थानिक शासन संस्था हीच मुख्य महिला राजकारणाची रंगभूमी ठरली आहे

विधानसभा आणि लोकसभा या पातळीवर स्त्रियांच्या राखीव जागांची मागणी केली जाते. मात्र स्थानिक शासन संस्थांच्याबरोबर विधानसभा व लोकसभा असा संयुक्त रंगमंच साकारला नाही. महिलांच्या नेतृत्वाची आणि प्रतिनिधित्वाची मागणी आल्यापासून जवळजवळ ४० वर्षे होत आली आहेत, तरीदेखील महिलांचा राजकीय रंगमंच स्थानिक शासन संस्थेकडून विधानसभा व लोकसभा या रणक्षेत्राकडे स्थलांतरित होत नाही. मतितार्थ असा की स्थानिक शासनसंस्था या रचनेमध्ये नेतृत्व आणि प्रतिनिधित्व महिला करतात, असे दिसते.

**विधानसभा व लोकसभा : आरक्षण**

भारतामध्ये विधानसभा व लोकसभा पातळीवर महिलांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. २००९ साली भारतात अकरा टक्के महिला निवडून आल्या. या दरम्यान स्पेन, जर्मनी, नेदरलँड, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड या देशांमध्ये महिला प्रतिनिधित्वाचे प्रमाण ३०% होते. या तुलनेत भारतात हे प्रमाण फारच कमी दिसते. यामुळे भारतामध्ये महिलांसाठी राखीव जागा ठेवाव्यात, या मुद्याची चर्चा सार्वजनिक पातळीवर होऊ लागली. महिला आरक्षणाच्या विधेयकामध्ये ठळकपणे चार मुद्दे मांडण्यात आले.

अ) लोकसभा व विधानसभेतील १/३ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात येतील.

ब) दलित, आदिवासी यांच्यासाठी ज्या जागा राखीव आहेत. त्यावरदेखील महिला आरक्षण लागू करण्यात येईल.

क) महिलांसाठी आरक्षित असणाऱ्या जागांमध्ये प्रत्येक

वेळी बदल करण्यात येईल.

ड) एखाद्या जागेवर सलग तीन निवडणुकांमध्ये केवळ एकदाच आरक्षण राहील.

या मुद्द्यावर राजकीय पक्ष आणि समूह त्यांच्या त्यांच्या पद्धतीने राजकारण करीत आहेत. श्रम-विभागणीमध्ये बदल झाला पाहिजे, असा दावा करणारा गट विधेयकाला पाठिंबा देतो, तर दुसरा गट ओबीसी व मुस्लिमांना रोखता येईल म्हणून महिला आरक्षणाला पाठिंबा देतो. यामुळे महिलांच्या संदर्भात कुरघोडीचे राजकारण साकारते. महिला विधेयकाला विरोध करण्याचे राजकारण घडते. हे राजकारण अर्थातच महिलांना मानवप्राणी म्हणून मान्यता न देणाऱ्या राजकीय पक्षांकडून व गटांकडून घडते. यावर उपाय काय? यासंदर्भात राजकीय पक्षांनी महिलांना उमेदवारी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात द्यावी, असा एक पर्याय जागतिक पातळीवर स्वीकारला आहे. या पर्यायांचा विचार केला जावा, असा आग्रह धरला जातो. या पर्यायांच्या संदर्भात राजकारण राजकीय पक्षांकडून केले जात नाही. आणि निवडणूक घेणारी यंत्रणांदेखील या प्रकारचा दबाव आणत नाही. यामुळे निवडणूक यंत्रणादेखील पुरुषीवर्चस्व असलेली दिसते.

महिला आरक्षणाच्या मसुद्याची मर्यादा महिला आरक्षण मसुद्यामध्ये महिलांसाठीचे राखीव मतदारसंघ फिरते असतील अशी तरतूद दिसते. सलग तीन निवडणुकांमध्ये महिलांसाठी एकदाच राखीव जागा असेल, याचा अर्थ दोन महिलांसाठी एकदाच राखीव जागा असेल, याचा अर्थ दोन निवडणुकांमध्ये महिलांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार नाही. तसेच मतदारसंघ फिरता असेल यामुळे महिला नेतृत्वावर व प्रतिनिधित्वाच्या कल्पनेवर फार मोठे परिणाम घडून येतात. महिलांचे नेतृत्व वाढणार नाही, महिला त्या मतदारसंघातील लोकांचे प्रतिनिधित्व करणार नाहीत. महिला पुढे संधी नसल्याने मतदारसंघाची बांधणी करणार नाहीत, असे प्रश्न यातून निर्माण होतात. यामुळे यापेक्षा वेगळा पर्याय महिला आरक्षणाच्या चर्चाविश्वात येत नाही.

राजकारणाचे रणक्षेत्र पुरुषवर्चस्वाचे आहे. या रणक्षेत्रात स्त्रियांची भागीदारी फारच कमी आहे. म्हणूनच पुरुषवर्चस्वाचा दावा केला जातो, असे नव्हे तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा पातळ्यांवर महिलांचा राजकीय सहभाग कमी असल्यामुळे दुय्यमपणा येतो. दुय्यमपणा याचा दुसरा अर्थ दुय्यम नागरिक होय. पुरुष हे प्रथम नागरिक ठरतात. कारण सत्ता, अधिकार, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांवर पुरुषांचा दावा असतो; तर महिलांना दुय्यम ठरवण्यातून सत्ता, अधिकार, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांवरील त्यांचा अधिकार कमी होतो, हे चर्चाविश्व लोकशाहीतील स्वातंत्र, अधिकार, समता या मूल्यांभोवती फिरणारे आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्या अधिकाराचा दावा केला जातो. राखीव जागांचे राजकारण यामुळे पुरुषवर्चस्वाच्या विरोधातील म्हणून भारतात सुपरिचित झाले आहे. यातूनच खासगीत स्त्रियांच्या राखीव जागांचे राजकारण पुरुषसत्तेच्या विरोधातील मानले जाते. या प्रकारचा अर्थबोध समाजात दिसतो. स्त्रियांच्या राखीव जागांचे राजकारण पुरुष व स्त्री असे राजकारणाचे अंतरायीकरण करण्याचे नव्हे. स्त्रियांच्या राखीव जागांचे राजकारण हे स्त्रीला मानवप्राणी म्हणून अधिमान्यता देण्याच्या राजकीय व्यवहाराचा एक भाग आहे. तसेच पुरुषांनादेखील वर्चस्वाच्या रणक्षेत्रातून बाहेर काढून वर्चस्वशाली मानवप्राण्याऐवजी सामाजिक मानवी व्यवहार करणारा 'सामाजिक प्राणी' अशी अधिमान्यता देण्याच्या राजकीय व्यवहाराचा एक भाग आहे. त्यामुळे स्त्रियांच्या राखीव जागांचे राजकारण केवळ स्त्रियांच्या समान हक्कांसाठीच नाही, तर मानवप्राणी म्हणून दोघांचा समान व्यवहार घडण्यासाठी आवश्यक मानले पाहिजे.

**महिलांचे राजकीयीकरण**

राजकारणाचे रणक्षेत्र निर्राजकीयीकरण झालेले आहे. राजकारणाच्या रणक्षेत्रातून राजकारणच हद्दपार झाले आहे. चर्चा, तडजोडी, संवाद, समझोता अशा पद्धतीने राजकारण करण्याची व्यूहरचना आणि क्षमतेचा ऱ्हास झाला आहे. राजकारण करताना या गोष्टी मध्यवर्ती स्त्रियांच्या राखीव जागांमुळे येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कारण पुरुषाऐवजी स्त्रियांनी राजकारण करण्याचा संवाद घडत आहे. राजकारण करताना पुरुष स्त्रियांबरोबर वाटाघाटी

करण्यास तयार होतात. स्त्रिया राजकीय पक्षांबरोबर समझोते करण्यात पुढाकार घेतात. तसेच नवीन सामाजिक समीकरणे मांडणे, जुन्या सामाजिक समीकरणाची पुनर्रचना करणे, यामध्ये स्त्रियांचा सहभाग दिसतोच. शिवाय शासनव्यवहार करण्यामध्ये चर्चा, तडजोडी, संवाद, सार्वजनिक विवेक या गोष्टींचे राजकीयीकरण होत आहे. अर्थात याप्रकारच्या राजकारणाचे निर्राजकीयीकरण झाल्यानंतर ही प्रक्रिया घडत आहे. त्यामुळे माहितीच्या राखीव जागांवरील राजकारणास राजकीयीकरणाचा एक संदर्भ आहे. या प्रकारचा फेरबदल राजकारणात होत आहे.

**क्षुल्लकीकरण विरोधी प्रक्रिया**

राजकारणाचे क्षुल्लकीकरण घडत होते. राजकारण वाईट आहे. राजकारण कुटीलता असते. राजकारणात गुन्हेगारी असते. राजकारणात पैशांचा व्यवहार होतो. राजकारण महिलांसाठी नाही. या प्रकारचा संवाद लोकशाहीच्या चर्चाविश्वात केला जातो. त्यामुळे राजकारणास क्षुल्लकीकरणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. राजकारण पोकळ झाले. मात्र राजकारणाचे रणक्षेत्र महिलांसाठी नाही अशी छाप असलेल्या रणक्षेत्रात स्त्रियांच्या राखीव जागांचे राजकारण सुरू झाले. म्हणजेच सर्व जातींतील महिलांसाठी राखीव जागा ठेवाव्यात. यामुळे राजकारणाच्या क्षुल्लकीकरणाविरोधी प्रक्रिया घडू लागली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये याप्रकारची प्रक्रिया गतिशील झाली आहे.

**सकलजनवादाचा आशय**

राजकारण सकलजनवादी होत नाही. राजकारण व्यक्तिलक्षी, गटलक्षी किंवा बहुसंख्याकलक्षी होते. त्यामुळे महिला सकलजनांच्याबाहेर असतात. महिलांच्या राखीव जागांच्या राजकारणाची चर्चा म्हणजे राजकारणाच्या रणक्षेत्राचे स्वरूप सकलजनवादी घडवणे होय. राजकारणाच्या रणक्षेत्राचा कायापालट होणे होय. राजकारणात एकाच वर्गातील किंवा जातीतील स्त्रिया नको म्हणून सर्वच जात आणि वर्गातील स्त्रियांसाठीचा दावा केला जातो. यामध्ये महिलांच्या राखीव जागा लांबणीवर टाकण्याचे राजकारण असले तरी या वादक्षेत्रातून राजकारणाचा पोत सकलजनवादी होण्यास मदत होत आहे. यामुळे महिलांच्या राखीव जागांचे राजकारण सकलजनवादाची मगणी ठरते.

**सारांश**

स्थानिक स्वराज्य संस्था ही महिलांच्या राजकारणाची मध्यभूमी आहे. परंतु या क्षेत्राच्या किंवा रचनेच्या बाहेर महिला राजकारण साकारत नाही. महिलांना विधानसभा व लोकसभा पातळीवर राखीव जागा देण्यातून राजकीयीकरणाची प्रक्रिया घडून येण्याबरोबरच राजकारणाचे क्षुल्लकीकरण होण्याची प्रक्रियादेखील थांबवता येईल व राजकारण सकलजनवादाच्या दिशेने वाटचाल करेल, असे म्हणता येते.

संदर्भ :


१) दलाई लामा : 'परिवर्तनवादी राजकारण आणि महिला आरक्षणाचा डाव,' *मिळून साऱ्याजणी*, २०१२.

२) पवार, वैशाली : 'महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख,' डायमंड प्रकाशन, पुणे, २०१२.

३) पवार, वैशाली : 'महाराष्ट्रातील महिलांचे राजकारण,' *पुरोगामी सत्यशोधक* (जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर), पुणे, २०१०.


■

E-mail : pawarvaishali06@gmail.com

स्त्रियांचे न्यूनगंड केवळ न्यूनगंडच असतात असं नाही, त्याचं मूल्य ती क्रयवस्तू म्हणून वापरण्याची बाजाराची सवय स्त्रियापण अंगिकारतात. त्यामुळे त्यासुद्धा स्वत:चा वापर करू देतात. जसं पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये त्या स्वत: ती मूल्ये सत्ता हातात आली की स्वीकारतात, दुसऱ्या स्त्रियांवर ऑपरेशन करू बघतात. तसंच हे आहे की कुठल्याही बाजारूव्यवस्थेमध्ये तुमच्याकडे सत्ता वा अधिकार असतात तेव्हा तुम्ही स्वत:ला किंवा इतरांना क्रयवस्तू म्हणून वापरता. तो काही आजार नाही लक्षण् बघायला. आता आपण सगळीकडे बघतो की जाहिरातलं,

# ओळख हरवलेली आहे...

डॉ० राजश्री देशपांडे



ग्लॅमरच्या जगातलं, मॉडेलिंग आदींमधून बायकांमध्ये येणारे अनोरेक्झीयासारखे विविध आजार किंवा शरीरावयावांना येणाऱ्या शैथिल्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या मानसिक रोगांना तोंड द्यावे लागते किंवा 'ब्लॅक इज ब्यूटी'- जे जे काळे ते ते सुंदर यासारखी चळवळ राबवावी लागते. म्हणजे गोरेपण सोडून सगळं नाकारायचं, उंच सोडून बाकी सगळं नाकारायचं, बारीक सोडून सगळं नाकारायचं- हे नैसर्गिकअसलं तरी. सशक्त नाकारा, सशक्त स्वीकारा. स्वत:ला त्रास होतो म्हणून सशक्त नाकारायचंय. त्यामुळे त्यांना स्वत:ला ठरवायचं की सशक्त, निरोगी काय आहे. योग्य काय आहे ते. स्त्रीसाठी आणि पुरुषांसाठीसुद्धा. हे जसं स्त्रियांसाठी होतंय तसंच ही बाजारूव्यवस्था आता पुरुषांसाठीसुद्धा मापदंड तयार करत आहे. फक्त स्त्रियांसाठी ती इतकी फिट्ट आहे की त्याचा बाईलाही त्रास होतोय, हे आता तिला कळेनासं झालंय. जसं गुलामाला गुलामीचा त्रास होईनासं होणं, तसं झालंय की काय असं मला वाटतं.

आता यूपी, बिहारमध्ये पाहिलं तर तिथल्या पुरुषांना आपल्या बायकोची काळजी असते. म्हणजे तिच्या शरीराची काळजी असते. तिच्या शरीराबद्दल त्यांना प्रेम असतं. तिनं आपल्याला शरीरसुख द्यावं, आपल्या कामाला पडावी, म्हणून ते असतं. व्यक्ती म्हणून नाही. तिचं दिसणं, असणं ठीक-ठाक असावं, हाच एक दृष्टिकोन असतो. दिल्लीतला किंवा यूपीतला मला स्वत:ला जाणवलेला अनुभव म्हणजे तिथं फार असुरक्षित वाटतं. त्या मानानं महाराष्ट्रात फारच सुरक्षित आणि छान वाटतं. तिथं आपण साधं रांगेमध्ये उभं राहिलो आणि एखादा पुरुष मागून येऊन पुढं घुसत असेल तर 'भैय्या आप लाइन मे खडे रहो, आगे मत घुसो' तर ते लोक तुमच्याकडे बघतसुद्धा नाहीत. पण तेच जर एखादा पुरुष त्याला म्हणाला की 'भैय्या आप लाइन मे खडे रहो' तर तोच घुसणारा माणूस चूपचाप मागे जाऊन रांगेमध्ये उभा राहतो. म्हणजे हे लोक स्त्रीला माणूस म्हणूनसुद्धा गिणत नाहीत, तिथं लिंगसमानता वगैरे याचं काय? हे खूप विकृत वाटतं. म्हणजे स्त्रीनं बोललेलं त्यांना चालतसुद्धा नाही. आणि चालत नाही हे दाखवायला ते आपल्याला काही बोलत नाही, पण फक्त गिणायचं नाही. दुर्लक्ष करतात. त्यांची स्त्रीकडे बघण्याची पद्धतसुद्धा खूप बेकार असते. ती नजरच इतकी बोचरी असते की ती आपल्याला कळतेही. माणूस म्हणून तुम्हाला ते तुच्छच समजतात. मग तुम्ही डॉक्टर असा की अशिक्षित असा, त्यांना काही फरक पडत नाही. माणूस म्हणून दखलच घेत नाही आणि घेतली तर बाई ही भोगवस्तू आहे, मादी आहे, अशीच घेतात. मग स्त्रीचं मत, तिचा विचार ह्या गोष्टी तर दूरची गोष्ट. एकदा नाही, दोनदा नाही हा तिथं मी सतत घेतलेला अनुभव आहे. आपल्याकडे महाराष्ट्रात किंवा दक्षिणेत असा अनुभव मला फार आलेला नाही. आता उडदामाजी काळेगोरे सगळीकडेच असतात. परंतु सरसकट प्रत्येक पुरुष आपल्याकडे त्याच नजरेनं बघतोय असा अनुभव मला तरी उत्तर भारतातच आलेला आहे.

माझ्या बालपणी कराड खूप लहान गाव होतं. या लहान गावात बाई म्हणून लोकांचे असलेले दृष्टिकोन हे पण एक आहे. एकतर आमची मुलींची शाळा. मी अगदी सुरक्षित मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातली लाडात वाढलेली मुलगी. त्यामुळे मला तर मुलगी असण्याचा भयंकर अभिमान होता. लहानपणापासून बाई म्हणून मला कमीपणा वाटेल किंवा गळचेपी होईल असा अनुभव आला नाही. नंतर मला ह्या गोष्टी जेव्हा जेव्हा पाहायला मिळाल्या, जाणवल्या किंवा लग्नानंतर आपसुकच जी दुय्यम भूमिका घ्यावीच लागते, असं माझ्या आईकडूनसुद्धा आलं की मला फारच वैताग यायचा. त्रास व्हायचा. पेशंटचं बघायला लागायचं. लग्नापूर्वी स्त्री म्हणून तडजोडी करण्याच्या प्रसंगांना मला कधीच तोंड द्यावं लागलं नाही. पण लग्नानंतर मात्र सतत तो घ्यावा लागला. तो काही लग्नामुळे नव्हे तर एकूणच समाजात मी अधिक मोकळेपणाने वावरायला लागल्यामुळे म्हणजे पाण्यात पडल्यावर जसं पोहावं लागतं तसं समाजात पडल्यावर दुय्यम भूमिका घ्यावी लागली. ज्या घरात मुस्लीम जावई आनंदानं स्वीकारला गेला अशा घरात मी वाढले.

आमच्या वर्गात एकही बहुजन, दलित मुलगी असल्याचं मला आठवत नाही.
पण बहुजनातल्या ज्या मुली होत्या त्यांना आमच्या शिक्षकांकडून दुय्यम वागणूक असायची.
त्यांना अशी प्रतिष्ठा नसायची. लंगडे, पाटील अशा नावाच्या त्या मुली देशपांडे, पटवर्धन
वगैरेंच्या मुलींप्रमाणेच हुशार होत्या. पण जी प्रतिष्ठा आम्हाला (जोशी, देशपांडे, पटवर्धन) होती,
तशी ती त्यांना नव्हती. एका अर्थानं ब्राह्मण जातीचे वर्चस्व होते.
पण हे सर्व मला फार खुपायचं.

■

आमची शाळा ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची होती. त्यामुळं आमच्या शाळेत बहुतेक मुली ह्या ब्राह्मण कुटुंबातल्याच होत्या. मी अ तुकडीत होते. त्यात सगळ्या हुशार आणि ब्राह्मण मुली होत्या. अगदी तुरळक शिंपी, मराठा वगैरे मुली ह्या बहुजन जातीतल्या होत्या. आमच्या वर्गात एकही बहुजन, दलित मुलगी असल्याचं मला आठवत नाही. पण बहुजनातल्या ज्या मुली होत्या त्यांना आमच्या शिक्षकांकडून दुय्यम वागणूक असायची. त्यांना अशी प्रतिष्ठा नसायची. लंगडे, पाटील अशा नावाच्या त्या मुली देशपांडे, पटवर्धन वगैरेंच्या मुलींप्रमाणेच हुशार होत्या. पण जी प्रतिष्ठा आम्हाला (जोशी, देशपांडे, पटवर्धन) होती, तशी ती त्यांना नव्हती. एका अर्थानं ब्राह्मण जातीचे वर्चस्व होते. पण हे सर्व मला फार खुपायचं. कारण मी त्यांची जवळची मैत्रिण होते. माझ्या बरोबरच्या बाकीच्या ब्राह्मण मुली त्यांच्या मैत्रिण नव्हत्या. त्यामुळे मी त्या दोन्हींतली दुवा होते. एक गंमत अशी होती की नाही म्हणायला बहुजन समाजातल्या ज्या मुलींचं ब्राह्मणीकरण झालं होतं. म्हणजे सवयींचं, बोलण्याचं, राहणीमानाचं. अशा मुलींना थोडी फार प्रतिष्ठा दिली जायची. पण ज्या ब्राह्मणीकरणापासून दूर होत्या, त्यांना काही प्रतिष्ठा नव्हती. कॉलेजामध्ये देखील आमचा हाच ग्रुप जशाच्या तसा होता. कॉलेजात गेल्यावर मग चळवळींची ओळख झाली. आम्ही छात्रभारतीमध्ये गेलो. मग डाव्या विचारांची ओळख झाली. आणि मग समाज काय असतो, जाती काय असतात, आपल्या कोशाच्या बाहेर बघणं, स्त्रियांच्या स्थितीबद्दल विचार वगैरे वगैरे सुरू झालं. आता हे सगळं बाळबोध होतं, अर्थात पण विचार करायला काहीएक सुरुवात झाली हे खरं. १९९२ ला हिंदू-मुस्लीम दंगल झाली, त्यानंतर आपण हिंदू असल्याचा अपराधबोध मला झाला. आतमध्ये काही तरी जाणवत होतं- पण ते धुसर होतं. काही तरी करावं असं वाटत होतं, पण अभ्यासामुळं काही करता येत नव्हतं. इंटर्नशिपमध्ये तर माझं अभ्यासात लक्षच नव्हतं. माझी ड्यूटी सांभाळून मला जेवढं करता येत होतं ते मी करत होते. एक वर्ष मी चळवळ, आंदोलनं, वस्त्यांमधून फिरणं, नर्मदा बचाव आंदोलन, निर्भय बनो वगैरेंमध्येच होते. आणि मग लग्न केलं. माझी इंटर्नशिप याच्यातच संपून गेली. मग परत एमडी मानसशास्त्राचं शिक्षण. यामुळे झालं काय की मी समाजात वावरायला लागले, माझे स्वत:चे दृष्टिकोन तयार व्हायला लागले. तोपर्यंत मी आले मानसशास्त्राकडे. मानसशास्त्र विशाल ज्ञानभंडार होतं. हे शिकताना आपली दृष्टी सगळी आत वळते. म्हणजे माणसाच्या आतले व्यवहार आणि बाहेरचे समाजातले आपण पाहत असलेले व्यवहार याची सांगड तेव्हा तर घालता येणं शक्य नव्हतं. कारण हे आतलं जाणून घ्यायलाच दोन-तीन वर्षे गेली. आणि हे बाहेरचं आकलन झालेलं भयंकर व्यामिश्र, गोंधळाचं होतं. कारण मुंबईची ती गर्दी, विषमता, वगैरे वगैरे नेमकं काय ते कळतच नव्हतं. सगळा गोंधळच होता. केईएममध्ये तर सामाजिक विचारांचा काही संबंधच नव्हता. शिवाय बोलायलाही कोणीच नसायचं. सगळं आतल्या आत, आतल्या आत. त्यामुळं माझी घुसमट व्हायची.

या सगळ्यात लग्नानंतर संपूर्ण विश्वच बदलून जातं. त्यावेळी मी पदव्यूत्तर शिक्षणासाठी मुंबईत होते.

अधूनमधून सुट्टीला मी पुण्यात येऊन जायचे. त्यावेळी आम्ही पुण्यात एक घर घेऊन ठेवलं होतं. तिथं आमचे संघटनेचे किंवा चळवळीचे- 'राष्ट्रसेवक क्रांती दल' मित्रमैत्रिणी एकत्र यायचे. राहायचे. मग शनिवार-रविवारी गेल्यावर बरंच काही काम करावं लागायचं. मग मला असा विचार पडायचा की अरे असे चळवळीचा वगैरे विचार सांगणारे ही मुलं घरात अशी का वागतात? मुलीच का काम करतात?

मुंबईतलं शिक्षण आटोपून साताऱ्यात आल्यावर मी थोडीशी निवांत झाले. इथं आल्यावर बरंच काही जाणवायला लागलं. मनमोकळं सांगायचं तर चळवळीतले पुरुष आणि चळवळीबाहेरचे पुरुष यांच्या पुरुषपणात फार काही फरक नाही. फार कमी पुरुष त्यांचा अहंकार बाजूला ठेवून आमच्या वर्षांनुवर्षं घडलेल्या पुरुषी मानसिकतेपणामुळे आमचं पुरुषीपण मध्ये मध्ये येतं आणि ते सोडायची आमची तयारी आहे. त्यासाठी आम्हाला तुम्ही मदत करा, असं प्रांजळपणे म्हणणारे फार कमी पुरुष माझ्या सहवासात आले. कदाचित मीच अशा पुरुषांच्या कमी सहवासात आले असेन. ही माझी मर्यादा असेल. पण असे पुरुष कमी होते हे नक्की. जे आपल्यातल्या बायकांशी तद्दन पुरुषीपणानेच वागायचे. हेच पुरुष इतर बायकांशी चांगले वागायचे आणि स्वत:च्या बायकोजवळ पुरुषीपणा दाखवायचे. म्हणजे तुम्ही जर चळवळीत आहात तरी तुम्ही त्याच टिपिकल पारंपरिक पद्धतीनं लग्न करता. बरं ठीकय लग्न झालं. मग निदान बायकोशी तरी समानतेनं वागावं, तर तेही नाही. पण मला फक्त ही पुरुषांचीच चूक आहे असं नाही वाटत. बायकाही तेवढ्याच पारंपरिकपद्धतीनं विचार करतात. तेवढ्याच पारंपरिक पद्धतीनं आपल्या हातात असलेली घरातली सत्ता सटलपणे जपण्याचा प्रयत्न करत असतात. घरातली सत्ता जपायच्या प्रयत्नांमध्ये पुरुषांनी काही बदलायचा प्रयत्न केला तर कदाचित त्याला अडथळा आणतात, अशीही काही उदाहरणं मी पाहिलेली आहेत.

एकूण दृष्टी खुली होती. नवीन गोष्टी स्वीकारायला अवसर होता. लोकांची मानसिकतापण अशी होती की, ठीकय काय काय नवीन येतंय ते आपण बघू या. यातून आपले आयुष्य सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध कसे होत जाते, ते बघूया, अशाप्रकारे लोक उत्सुक होते. म्हणजे तेव्हा उत्सुक होते, पण आता धास्तावलेले असतात. त्यामुळे नवीन गोष्टींना सामोरे जाताना जास्तच घाबरलेले आहेत. त्यामुळे मग जुनं जुनं धरून बसतात. मी हे बहुजन समाजाबद्दल बोलतेय. म्हणजे मार्गशीर्षाचे गुरुवार पुन्हा सुरू होतात, व्रतवैकल्ये जास्त धरली जातात. आधी जो खुलेपणा होता तो आता बंद बंद होत गेलाय आणि जुन्याला चिकटणं वाढतंय. कारण आता धास्तावलेपण जास्त आहे, तेव्हाची उत्सुकता आता केव्हाच लयाला गेलीय.

स्त्रियांच्या कुचंबणेचा लसावी असा आहे की भावनिक परावलंबित्व आहे. पण त्यातदेखील विविधता असते. भावनिक परावलंबित्व हे खूप जास्त प्रमाणात आणि त्यामुळे आलेला व्यावहारिक परालंबित्व हे खूप जास्त प्रमाणात वरच्या वर्गात आहे. जगण्याची लढाई अतिशय त्रासदायक व किचकट असल्यामुळे खालच्या वर्गातला व्यावहारिक अवलंबित्व हे कमी राहते. बाईला काही ना काही करून हातपाय हालवावे लागतात, कष्ट करावे लागतात. त्यामुळे व्यावहारिकदृष्ट्या तिला काही एक भान असतं. आताच्या व्यावहारिक जगातल्या गोष्टी तिला कळत नसतील. म्हणजे तिला एसटीचा बोर्ड वाचता येत नसेल, पण तिच्या तिच्या जगण्याच्या परिघातला व्यवहार तिला चांगला कळत असतो. त्यामुळे तसे तिचं व्यावहारिक अवलंबित्व कमी असते. त्यामुळे आलेला भावनिक खंबीरपणाही तिच्याकडे जास्त असतो. पण एकूणच व्यवस्थेमधून येणारा अन्याय तिला जास्त सहन करावा लागतो. आर्थिकदृष्ट्या होणारी कुचंबणा, गावपातळीवरील आर्थिक दैन्य, निर्णयपातळीवर तिच्या मताला अजिबातच किंमत नसणं. ह्या सगळ्याचा परिणाम स्त्री म्हणून अधिक खालच्या लेवलला त्या बाईला भोगावा लागतो. म्हणजे अन्यायात ती अधिक खालच्या उतरंडीला येते, जरी तिच्याकडे इंडिपेडन्स जास्त असला तरी.

तिथंही बाईला दुय्यम वागणूक मिळणारच आहे. उलट व्यावहारिक जबाबदाऱ्या तिथं जास्त पडत नाहीत, कारण सोयीसुविधा असतात. आणि घरीच असल्याने मग नोकरीची गरज नसते, पैशांचीही तशी गरज पडत नाही. किंवा अगदीच गरज पडली तर बाईनं नोकरी करणं, हे आता आतापर्यंत चालू होतं. माझ्यासमोर अशी काही उदाहरणं आहेत की नवरा चिक्कार कमवत असल्याने डॉक्टर असलेली मुलगी घरीच बसून राहते. याचा अर्थ अजूनही सरसकट मुली असं म्हणत नाहीत की माझ्या ज्ञानाचा, क्षमतांचा उपयोग झाला पाहिजे. माझ्या ज्ञानाचा उपयोग समृद्ध करण्यासाठी, माझ्या समाधानासाठी करायचा आहे. उगीच करायचं आहे म्हणून करणार, असं नाही. एकूणच आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये हे उपयुक्तता मूल्य आहे की पैसा कमावण्यासाठी झाला पाहिजे. पैसा मिळतोय तर मग कशाला सोडा. म्हणजे पैसा मिळतोय म्हणून शिक्षण, असं झालंय. किंवा गरज असली तर बाईनं नोकरी करायची, कमवायचं. हे सगळं करतानासुद्धा तिला हे सतत वाटत राहतं की घरात किंवा घराबाहेरच्या व्यवस्थेमध्ये आपण दुय्यम आहोत. घरातल्या निर्णयांबाबत घराघरातल्या संस्कृतीनुसार फरक असतो. काही घरात स्त्रियांना पुरेसं स्वातंत्र्य असतं, समता असते. किंवा काही वेळा तिथंही पुरुषच डॉमिनेट करतात, किंवा काही ठिकाणी बाईच अगदी डॉमिनेटिंग असते. पण बाहेर वावरताना, बाहेरच्या जबाबदाऱ्यांमध्ये मात्र जरी स्त्री सर्व जबाबदाऱ्या स्वत:हून घेत असली तरी दाखवताना असं दाखवायचं की 'नाही बाबा, आमचे हे करतात सगळं, आमच्या ह्यांना विचारलं पाहिजे.' किंवा बाई करतेय म्हटल्यावर इतरजणही सर्वार्थानं पिळवणूक करायला बघतात की, 'हिला काय कळत असेल?' मग त्या बाईला दाखवावं लागतं की 'नाही नाही, मला आहे हं पुरुषाचा आधार.' या सगळ्यामुळे आपोआपच ती मनातल्या मनामध्ये दुय्यमत्व स्वीकारते. मध्यमवर्गीय पातळीवर हे वास्तव जास्त असतं. कष्टकरी वर्गात याची गरज नसते. कारण तिथं उघडउघडच असतं- 'ऐकलंच पाहिजेस.' तिथं बायकांनी जरी त्या भावनिक, व्यावहारिकदृष्ट्या मनातून जास्त स्वतंत्र असल्या तरी त्यांनी हे बिनशर्त स्वीकारलेलं असतं की आहे हे असंच असणार. नवऱ्यानं मारायचं आणि आपण मार खायचा. तो म्हणणार की 'तुला काय कळतंय, गप्प बैस, तर गप्प बसायचं.' बापानं म्हटलं की याच्याशी लग्न कर, तर त्याच्याशीच लग्न करायचं. पळून जाऊन लग्न करणं वगैरे हे आताच्या पिढीत जास्त दिसतंय, पण बिनशर्त स्वीकार हा आहेच. मग वाईट स्थिती कुणाची जास्त आहे, मी नाही तुलना करू शकत. मी नाही असं म्हणू शकत की तिथं स्थिती जास्त वाईट आहे आणि इथं स्थिती जास्त चांगली आहे. दोन्हीकडंही त्या त्या पातळीवरची दु:खं आहेतच. इथं बिनशर्त स्वीकार आहे या गोष्टींचा म्हणून दु:ख आहे. भावनिकदृष्ट्या जास्त परावलंबित्व आहे म्हणून दु:ख जास्त आहे. म्हणून होणारे अपमान जास्त आहेत, म्हणून करावी लागणारी तडजोड जास्त आहे. या दोन्ही वर्गातल्या बायकांमध्ये मानसिक औदासिन्यतेचे प्रमाण भरपूर आढळतं. फक्त वरच्या वर्गातल्या बायकांचा भाषेचा विकास जास्त असल्यामुळे त्या म्हणू शकतात की मला उदास वाटतंय. खालच्या वर्गातल्या बाईला उदास वाटतंय असं म्हणण्याची चैन परवडत नाही, पण मनात ते ठसठस असतेच ना डावललं गेल्याची. त्यांचं ते औदासिन्य शरीराद्वारे व्यक्त होतं. मग ते सोमटायझेशन (निरिच्छ) आपण म्हणतो, मला कसं तरी वाटतंय, कुणाचं अंगच दुखतंय, डोक्यात चुणचुण होतंय वगैरे ज्याला सोमॅटिक लक्षणं म्हणतात नॉन-स्पेसिफिक अशी शारीरिक लक्षणं- जी कुठल्याही शारीरिक आजारामुळं न उद्भवलेली असतात. अशा शारीरिक लक्षणांचे मानसिक आजार. हे खालच्या वर्गातल्या स्त्रियांमध्ये पुष्कळ प्रमाणात दिसून येतं. व्यवस्थित औदासिन्यतेची लक्षणं असलेलं नैराश्य, असं डिप्रेशन. किंवा चिंतारोग- एन्झायटिक- वरील....अर्थात हे माझं निरीक्षण आहे, मी काही सर्व्हे किंवा अभ्यास करून नोंदवलेलं लक्षण नाही. सोमाटायझेशन डिसऑर्डरसुद्धा डायग्नोसिस होताना उपचार केला जातो ते पण एन्झायटिक डिसऑर्डरचं किंवा डिप्रेशन डिसऑर्डरचंच एक रूप आहे.

मी अजिबात असं म्हणत नाही की त्यांची त्यात चूक आहे म्हणून. पण ह्या सगळ्यांत तेही कुठंतरी व्हिक्टीम झालेले आहेत. जसा आता आपण बायकांच्या मन:स्थितीवर होणाऱ्या परिणामांचा विचार करतोय तसा पुरुषांच्या मन:स्थितीवरही काही तरी परिणाम होत असेल ना?

■

फक्त शरीराच्या भाषेतून व्यक्त होणारं दु:ख, असं म्हणू आपण आणि हे मनाच्याच भाषेतून किंवा मनाच्याच लक्षणातून व्यक्त होणारं दु:ख. 'मला उदासच वाटतंय, मला खूप रडू येतंय, मी घरीच पडून राहिलीय, मला उद्याची खूप चिंता-काळजी वाटतेय' ही सगळी चैन बौद्धिक किंवा मानसिकदृष्ट्या खालच्या वर्गातल्या स्त्रीला जगण्याच्या रोजच्या लढाईत परवडत नाही. पण जेव्हा तिचे पायच दुखतायत, जेव्हा तिची कंबरच दुखतेय, जेव्हा तिचं डोकंच दुखतंय...तेव्हा ती अगतिकत असते. म्हणजे तिचा मेंदू त्या त्रासाने, दु:खाने काम करायचं इतका नाकारतो की तो शरीराला थांबायला भाग पाडतो. मेंदू आणि शरीर हे एकमेकांना संलग्नच आहेत ना. आणि मेंदूची अशी काही वेगळी भाषा नसते. त्याला जे काही बोलायचं असतं ते तो शरीराद्वारेच बोलतो.

ज्यांना आपण काही तरी निर्माण करू शकतो असं कौशल्य आहे, ज्यांना बाहेर पडण्याच्या संध्या उपलब्ध आहेत, संवाद साधण्याची ज्यांना सवड आणि सोय आहे. म्हणजे शेती करण्यासाठी बाहेर पडणारी जी बाई असते ती साहजिकच दुसऱ्या बायकांशी बोलणार. पण जी गोशात राहणार, घरातच राहणार, जी फक्त नवऱ्याच्या सोयीनं संपत्तीचं प्रदर्शन करू शकणार तिला हा स्वातंत्र्य नाही येऊ शकत. ती कुढणार, नवऱ्याच्याच मर्जीवर राहणार. या दोन्ही वर्गातल्या स्त्रियांच्या मनोविकारांच्या अभिव्यक्तीचे स्वरूप वेग-वेगळं असणार. औदासिन्य ही त्यांची अवस्था वेगवेगळ्या लक्षणांतून व्यक्त होणार. म्हणजे वरच्या वर्गातल्या बायका जास्त घाबरलेल्या राहणार. ज्यांच्याकडे आर्थिक सुरक्षा आहे, पण कुठल्याही अर्थाने त्या आतल्या आत घुसमटलेल्या, दडपलेल्याच- गोशात आहेत. उदा. शहाण्णव कुळी मराठा समाजातल्या बायका. अशा बायका कायम वैतागलेल्या असतात किंवा मग श्रीमंतीला चटावलेल्या, कुटील कारस्थानात रमलेल्या, राजकारणात रमलेल्या, ज्यांच्या अधिन नवरे असतात. नवऱ्यांना अधिन करायचं म्हणजे त्यात मादी हा घटक असतोच. मादीचा रोल संपला की त्यांची सत्ताही संपतेच. त्यामुळे त्याही सतत ह्या ताणात असतात की आपलं मादीत्व जपणं. हे मादीपण संपल्याच्या भीतीनंही औदासिन्य येतं. आणि ज्यांना मुलंच नसतात, ज्यांना ते नको असतं, ज्यांना बाहेरच्या जगाची ओढ असते.

वरच्या स्तरात आपण चांगलं दिसलो तरच निभाव लागेल, हे जिथं तिचा मादी म्हणूनच टिकाव लागणार आहे आणि पुरुष जन्माला घालण्यावर टिकाव लागणार आहे याबाबतीत फिगर म्हणूनची जाणीव ही इकडेच जास्त असणार आहे. कष्टकरी बाईच्या नैसर्गिक सौंदर्याचं, तिच्या नैसर्गिक खळाळतेचं अपिल लोकांना जास्त होतं. सिनेमातसुद्धा दाखवतात. मुळात हेल्थ म्हणून असणारा अवेरनेस कुठंच- दोन्हीकडेही नाही. फिगर म्हणून असणारी जाणीव इकडे आहे असं आपल्याला वाटतं पण तोही एका मर्यादेनंतर किंवा त्यातला फोलपणा कळल्यानंतर कमी होतो. पण कुठल्याच एका व्यक्तीबरोबर जर भावनिक बांधिलकी आणि रोमान्स नसेल तर ते आकर्षण कमी होणारच असतं. हे अतिशय साहजिक आहे. हे त्या नातेसंबंधामध्ये असलेल्या दोन्ही जोडीदारांना काही दिवसांनी फोलपणा लक्षात आल्यानंतर कळतं. यातही काही स्त्रियांना तो चार्म असतो आणि तो त्या टिकवताततही. मग त्या कुठल्याही वर्गातल्या असू दे. स्त्री प्रतिमा म्हणून किंवा आत्मसन्मान म्हणून म्हटलं तर निश्चितपणे आत्मसन्मान हा जास्तप्रमाणात कष्टकरी वर्गातल्या बायकांना जास्त असतो. आता बाजारकेंद्रित धोरणांमुळे ही कष्टकरी स्त्री जास्तीत जास्त दुबळी होत चालली आहे. कारण या बाजारू व्यवस्थेनं आता गावोगाव

बकालपणा येत चाललाय, तिचं पारंपरिक कौशल्य टाकाऊ वा निरुपयोगी होतंय, शेती डबघाईला येत चाललीय, या सगळ्यात ती जास्तीत जास्त दुबळी होत चाललीय. म्हणजे तिला आत्मसन्मान निश्चितपणे जास्त असला तरी ती आता टिकूच शकत नाही, अशी परिस्थिती आहे. आणि हा केवळ स्त्रियांचाच प्रश्न आहे असं नाही, तर एकूणच गावागावांतल्या लोकांचा प्रश्न आहे.

पुरुष आत्महत्या करून मोकळा होतो, तसं बाईला आत्महत्या करून मोकळं होता येत नाही. ती आत्महत्या करूच शकत नाही. मुलांना कोणाच्या जिवावर सोडून जाईल ती? पुरुष सहजपणे निघून जातो कारण त्याला पर्याय आहेत, तसं तिला पर्याय आहेत का? म्हणजे पुरुषाला नेहमी पर्याय आहे - बाई करेल, हा. पण तिला पर्याय नाही. कारण तिला माहीतेय की मी नाही तर कोण करेल? बाई जास्त जुळवून घेणारी आणि चिवट असते. औदासिन्य सोडून कुठलेही मानसिक आजार पुरुषांमध्ये जास्त असतात. चिंतारोग आणि एन्झायटिक हे दोन आजार बायकांमध्ये जास्त असतात. पण ते त्यांना मारत नाहीत. यशस्वी आत्महत्यांचं प्रमाण पुरुषांमध्ये जास्त असतं. आत्महत्यांच्या प्रयत्नांचं प्रमाण बायकांमध्ये जास्त असतं. असा प्रयत्न करून त्या लक्ष वेधू इच्छितात. पुरुषांना सगळं एकट्यानं हाताळायचं असतं. त्यात त्यांचा अहंकार खूप असतो, तो त्यांना खरोखरंच अगतिक बनवून टाकतो. मी अजिबात असं म्हणत नाही की त्यांची त्यात चूक आहे म्हणून. पण ह्या सगळ्यांत तेही कुठंतरी बळी झालेले आहेत. जसा आता आपण बायकांच्या मन:स्थितीवर होणाऱ्या परिणामांचा विचार करतोय तसा पुरुषांच्या मन:स्थितीवरही काही तरी परिणाम होत असेल ना?

आता खूप प्रचंड वेगाने सामाजिक बदल होतायत. एकत्र कुटुंबपद्धती मोडत मोडत आता त्या विभक्त आणि छोट्या छोट्या झाल्या. पूर्वी हळूहळू बदल होत असत. त्याची गती तशी संथ होती. पण १९८०-९० नंतर प्रचंड वेगाने बदल घडतोय. आता जी मूल्ये आपण मानतो त्यांना पुढच्या दोनचार वर्षांत काही अर्थ उरणार नाही अशी परिस्थिती आहे. ज्या गोष्टींच्या भरवशावर आपण वाढलो त्या गोष्टी निघून जाताना दिसतायत. एकंदर सगळ्याच गोष्टींकडे- त्यात माणूस, त्याच्या भावना, नातेसंबंध- आपण क्रयवस्तू म्हणून बघू लागलो आहोत. सगळं वस्तुकरण झालेलं आहे. पूर्वी वस्तूंनाही आपण सजीवासारखं वागवायचो. आता या सगळ्याचं उलटं झालं आहे. आता माणसांमध्ये माणूसपण राहिले नाही. यामुळे पूर्वीचा जो एक अर्थपूर्ण अवकाश होता, तो आता अर्थपूर्ण राहिलेला नाही. माणसं वेगानं शहरांकडे जातायत. तिथं त्यांना काही ओळखच राहिलेली नाही. ओळख गेल्यामुळे सैरभैरपणा खूप वाढला. ही आयडेंटीटी कुठल्या कुठल्या संदर्भात गेली, तर कौटुंबिक संदर्भात गेली, नात्यांच्या संदर्भात गेली, गावात काहीप्रमाणात अन्याय होता, पण त्याचबरोबर एक ओळखही होती. आता ती सर्व निघून गेलीय. कौशल्यामुळे प्रत्येकाच्या जगण्याला एक संदर्भाचे सातत्य होते, ते आता उरलेले नाही. या सगळ्यांतून अस्तित्वाबद्दल प्रश्न पडायला लागले. ते प्रश्न पडू न देण्याइतका आता आयुष्याचा वेग वाढलाय. म्हणजे प्रश्नांबद्दल विचारच करू नये. आयुष्याला आनंद देणाऱ्या, समाधान देणाऱ्या ज्या काही छोट्या छोट्या गोष्टी होत्या त्या फालतू आहेत असं बिंबवलं जाऊ लागलं. तुम्ही कशाचा आनंद घ्यायचा हेपण आता जाहिराती, दूरचित्रवाहिन्या इ० आधारित बाजार ठरवतो. त्याच आपल्याला सांगतात की 'तुम्ही मॉलमध्ये जा, मल्टीप्लेक्समध्ये जा, तुम्ही हे घ्या, ते घ्या' वगैरे. याचं आकर्षण तरुणपिढीला वाटतं. अशा ठिकाणी जाण्यासाठी लागणारा पैसा फार थोड्या लोकांकडे आहे. टीव्हीनं तर सगळ्यांसमोर स्वप्नं ठेवून ती विकायला काढली आणि मोठं दारच खुलं केलं. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे व्यसनं वाढली. शिक्षणव्यवस्थेला काही अर्थच राहिला नाही. या सगळ्यांतून सर्वप्रकारची ओळख पुसून टाकली जात आहे.

■

# युरोपकेंद्रित स्त्रीप्रश्न

कॉ० विलास सोनवणे

युरोपमध्ये सामंतशाही नष्ट झाली. भांडवलशाहीने सामंतशाहीला पराभूत केल्यानंतर औपचारिकपणे का होईना समाजातली प्रत्येक व्यक्ती व्यक्ती झाली. तोपर्यंत ती व्यक्ती नव्हती. म्हणजे कुळांना आणि स्त्रियांना युरोपमध्ये काही अधिकारच नव्हता. व्यक्ती झाली आणि त्यातून प्रश्न असा निर्माण झाला की व्यक्ती-व्यक्तींमधील नातं कसं असेल. म्हणजे युरोपियन सामंतवाद्यांच्या, सरंजामशाहीच्या व्यक्तींबद्दलच्या ज्या व्याख्या होत्या, त्याच्यात 'सामंत पुरुष' एवढंच होतं. सामंती स्त्रिया ह्या त्या पुरुषांच्या आई, बहीण वगैरे वगैरे नात्यांनी मानलेल्या होत्या. त्या स्त्रियांना स्वतंत्र असं काही स्थान नव्हतं. स्वातंत्र्य नव्हतं. परंतु कष्टकरी वर्गातील स्त्रीपुरुषांनाही व्यक्ती म्हणून काही अधिकार नव्हते. म्हणजे 'थ्री मस्कीटियर्स' वगैरे फ्रेंच कादंबऱ्या पाहिल्या तर त्यात असं दिसेल की पाठीवर, हातावर गोंदलेलं असायचं की तू जेलमध्ये होतास म्हणून. म्हणजे एखादा माणूस जेलमधून पळून गेलेला असेल आणि तो सापडला - एका सामंताचा प्रदेश संपला की दुसऱ्याचा सुरू व्हायचा - आताच्या सारखी त्या काळात शहरं नव्हती. म्हणजे माणसं इनविझिबल, अदृश्य, चेहरानसलेली (फेसलेस) होत नव्हती. तर ते सगळं संपलं आणि व्यक्ती नावाची गोष्ट निर्माण झाली. आणि मग व्यक्ती-व्यक्तींमधला संबंध काय? व्यक्ती म्हणून समष्टी- समाज याचा संबंध काय? आणि व्यक्ती-व्यक्ती म्हणून स्त्री आणि पुरुष यांचा संबंध काय? या राष्ट्रातली व्यक्ती आणि त्या राष्ट्रातली व्यक्ती यांचा संबंध काय? असे प्रश्न पहिल्यांदा यायला सुरुवात झाली. मग सामाजिक संबंधांच्या नव्या व्याख्या करण्याचा प्रश्न आला. त्या व्याख्या करण्याचे प्रयोग तत्त्वज्ञानाच्या, अर्थशास्त्राच्या पातळीवर पहिल्यांदा सुरू झाले. संस्कृतीच्या पातळीवरही सुरू झाले. पहिल्यांदा युरोपमध्ये अशी भूमिका घेतली गेली की धर्माचा राजकारणाशी काही संबंध असता कामा नये. ही मोठी स्टेप, पाऊल आहे. तोपर्यंत युरोपमध्ये धर्मसत्ता आणि राजसत्ता यात काही फरक नव्हता. उदा. वसाहतवादाची सुरुवात होताना स्पेन आणि पोर्तुगाल हे पोपचे लाडके होते. म्हणून त्यांना ज्या सवलती पोपकडून मिळाल्या त्या बाकीच्यांना मिळाल्या नाहीत. त्याच्या विरुद्धचं बंड- प्रोटेस्ट ज्यांनी केलं ते प्रोटेस्टंट (निषेदवादी) झाले. प्रोटेस्टंट होताना भांडवलशाहीनं धर्मसत्ता व राजसत्ता ह्या वेगळ्या केल्या. राजसत्ता ही स्वतंत्र गोष्ट आहे, त्यामुळे धर्मसत्तेनं त्यात लुडबूड करायची नाही असं केलं. अशा अनेक गोष्टी पहिल्यांदा भांडवलशाहीनं युरोपमध्ये आणल्या. आपल्याकडे भांडवलशाही आली नव्हती. आपल्याकडे जी भांडवलशाही आली ती युरोपियन- त्यातल्या त्यात ब्रिटिशांनी आणली. इंग्लंडमधल्या भांडवली विकासाला पूरक म्हणून एका बाजूला इथल्या त्यांना हव्या असलेल्या बाजारपेठेचा विस्तार आणि विकास, त्यांना आवश्यक असलेल्या कच्च्या मालाचा विस्तार आणि विकास, त्यांना त्यांच्या लुटीसाठी सोईस्कर कायदे असं सगळं आपल्याकडे आलं. ते आणताना त्यांनी इथल्या सामंतवर्गाचीच मदत घेतली. युरोपमध्ये त्यांनी जी धर्मसत्तेबद्दलची भूमिका घेतली तशी इथं घेतली नाही. १८५७ पर्यंत इस्ट इंडिया कंपनी होती, त्यानंतर विक्टोरियाचं राज्य सुरू झालं. १८५७ चा राणीचा जाहीरनामा जर नीट बघितला तर त्यात त्यांनी स्वच्छपणे म्हटलेलं आहे की आम्ही तुमच्या धार्मिक बाबतीत ढवळा ढवळ करणार नाही. असं युरोपमध्ये

नाही झालं. तिथं प्रोटेस्टंट आले आणि त्यांच्या दबावामुळे चर्चला मागे सरकावं लागलं. सगळा युरोप जरी प्रोटेस्टंट झाला नाही तरी धर्मसत्ता आणि राजसत्ता अशी विभागणी झाली. तसं त्यांनी इथं केलं नाही. सामाजिक संबंधांची व्याख्या करताना युरोपमधल्या भूमिका वेगळ्या आणि वसाहतींमधल्या भूमिका वेगळ्या. युरोपमध्ये संबंधांच्या नव्या व्याख्या करायला नित्सेपासून ते हेगेलपर्यंत मोठी परंपरा आहे, पण आज आपल्याला त्यात जायची गरज नाही. पण आपल्याला मार्क्सपासून सुरुवात करता येईल. मार्क्स हा असा पहिला माणूस आहे की ज्याने सामाजिक संबंधांचा भौतिक पाया काय? असा प्रश्न उपस्थित केला. सामाजिक संबंध हे त्या त्या दोन व्यक्तींच्या भौतिक परिस्थितीनुसार ठरतात. भौतिक परिस्थिती व्याख्यीत करायची तर तिचं ठोस प्रतीक हे उत्पादनाचं साधन असतं.

उत्पादनाचं साधन हे त्या दोन व्यक्तींमधील सामाजिक स्थान काय हे ठरवत असतं. त्या साधनाशी असलेले संबंध. मी मालक आहे की कामगार आहे, हे पहिल्यांदा उत्पादनाचं साधन ठरवतं. ही नुसती व्याख्या नाही झाली, तर पहिल्यांदा मार्क्सवर आणि कम्युनिस्टांवर युरोपमध्ये अशी टीका सुरू झाली होती की कम्युनिस्टांचं सरकार जर सत्तेवर आलं तर स्त्रियांची परिस्थिती अत्यंत दयनीय होईल. ते साम्यवादी असल्याने कुणाची बायको सुरक्षित राहणार नाही. वगैरे टीका सुरू झाली. 'कम्युनिस्ट जाहिरनाम्या'मध्ये मार्क्स असं म्हणतो की भांडवलदार असं म्हणतायत की मी त्यांना सांगू इच्छितो की आम्ही स्त्रियांना व्यक्ती मानतो आणि तुम्ही स्त्रियांना वस्तू मानता. आमची लढाई ही प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याची लढाई आहे. तुम्ही वस्तू मानत असल्याने तुमच्या मनात तसाच विचार येतो तो म्हणजे भोगायचा. आम्ही व्यक्ती मानत असल्याने तसा विचार करूच शकत नाही. हे वास्तविक स्त्रीवादाबद्दलचं बेसिक पाऊल आहे. सामंती स्त्रीपुरुष नात्यांपासून जे घडत आलं, घडलं त्याच्यामध्ये पहिलं क्रांतिकारी पाऊल मार्क्सनं उचललं. याचे नेमके परिणाम असे झाले की एक तर कामगार स्त्रिया मोठ्या संख्येने कामगार चळवळीमध्ये यायला लागल्या. त्यामुळे जुन्या सामंतांच्या, व्यापाऱ्यांच्या, भांडवलदारांच्या स्त्रियांनीसुद्धा आम्हाला कमीत कमी व्यक्ती म्हणून बरोबरीनं वागवा, आम्हालाही पार्लमेंटमध्ये येऊ द्या, अशी चळवळ सुरू केली. या चळवळीतल्या स्त्रियांचे- ज्याला सॅफ्रोजेट म्हणतात- सुरुवातीचे जे इंग्लंडमधले फोटो आहेत...लॉर्डस्च्या आणि सर लोकांच्या बायकोंनी 'आम्हालासुद्धा मतदानाचा अधिकार द्या,' असे जे मोर्चे काढले त्यात त्यांचा सगळा लवाजमा म्हणजे त्यांची कुत्री, या कुत्र्यांना सांभाळणाऱ्या कामगार बायका असं सगळं आहे. पण या कामगार बायकांनाही स्वातंत्र्य द्या असं त्या म्हणत नव्हत्या. ज्या सरदारांच्या, लॉर्डच्या, भांडवलदारांच्या (प्रॉपर्डिड क्लास) वर्गातल्याच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनं वागू द्या, अशी ती मागणी होती. मार्क्सने जी व्याख्या केली त्याच्यामुळे हे झालेले परिणाम आहेत. म्हणजे या स्त्रियांनी कामगार-कष्टकरी स्त्रियांबद्दल मागणी केली नसली तरीसुद्धा स्वत:च्या वर्गातल्या स्त्रियांसाठी मागणी केली. तर हासुद्धा एक परिणाम आलेला आहे. हा अप्रत्यक्ष परिणाम स्त्रीवादाची चर्चा करताना आपल्याकडे कुणी सांगत नाही.

१८७० साली पॅरीसच्या कामगार स्त्री-पुरुषांनी उठाव करून भांडवलदारांची सत्ता नष्ट केली व पहिलं कम्युनिस्ट राज्य स्थापन करायचा प्रयत्न केला. त्यात त्यांनी काही चुका केल्या. पहिली मोठी चूक म्हणजे आपण व्यक्ती स्वातंत्र्यवादी आहोत म्हटल्यावर त्यांनी पार्लमेंटमध्ये अल्पसंख्याक आहेत म्हणून भांडवलदारांना पण घेतलं. कारण दुसरी गोष्ट त्यांनी भांडवलदारांना नि:शस्त्र नाही केलं. राज्य स्थापन झालं म्हटल्यानंतर त्यांनी भोळेपणानं पुढं जायला सुरुवात केली. ४५ दिवसांत ते सरकार कोसळलं. याच्यावर मार्क्सचं 'पॅरिस कम्युनचे धडे' असं एक पुस्तक आहे. पॅरिस कम्युनच्या चुका टाळत धडा घेत पुढे लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक कम्युनिस्ट पक्ष निर्माण झाला.

१९०५ च्या फसलेल्या क्रांतीचं वर्णन करणारी मॅक्झिम गोर्कीची 'आई' ही एक कादंबरी आहे. या

कादंबरीत फक्त पुरुष नाहीत तर स्त्री आणि पुरुष बरोबरीच्या पातळीवर येतात. यात गोर्की आणखी एक भूमिका घेतो ती म्हणजे मार्क्सची ईश्वर आणि धर्माच्या संबंधीची जी भूमिका आहे - धर्म ही 'हृदयहीनांचं हृदय आहे. हार्ट ऑफ दी हार्टलेस.' आणि आपल्या कष्टानं अत्यंत अगतिक झालेले जे लोक असतात त्यांच्यासाठी धर्म ही अफूच्या गोळीसारखं काम करतं. धर्म ही अफूची गोळी आहे असं नाही म्हटलेलं. जे अगतिक झालेले आहेत, जे गलितगात्र झालेले आहेत, ज्यांना काही दिशा नाही त्यांच्यासाठी धर्म ही अफूच्या गोळीचं काम करतं. म्हणजे काही नाही तर हा आधार आहे बुवा असं. 'आई' कादंबरीमधला एक प्रसंग असा आहे की मधल्या घरात कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांची एक मीटिंग चाललेली असते. त्यात ते सगळे देवाबद्दल बोलत असतात आणि आई बाहेरून ऐकते. सकाळ होते. सगळे कार्यकर्ते निघून जातात. आई तिच्या मुलाला- पावेलला विचारते की 'काय रे तुम्ही देव मानत नाहीत?' म्हणजे तिला या सगळ्या लोकांबद्दल प्रचंड आदर असतो की हे कष्टकऱ्यांबद्दल चांगलं काम करतात म्हणून. त्या पावेलच्या तोंडी गोर्कीनं एक वाक्य घातलं आहे की 'आई, तू ज्या येशूला मानतेस ना त्या येशूला आम्ही मानतो, पण झार ज्या येशूला मानतो ना त्याला आम्ही मानत नाही.' इथं पहिला डिव्हाइड आहे. १८४८ ला मार्क्सची भूमिका आल्यानंतर पुढच्या पन्नास वर्षांच्या काळात काय घडलं, याचं एक प्रतिबिंब या कादंबरीत दिसतं. याच काळात जर्मन कम्युनिस्ट पक्ष हा सातत्याने स्त्रियांच्या बाजूने होता. रोझा लक्झंबर, क्लारा झेटकिन इत्यादी. म्हणजे केवळ नेतृत्वच नव्हे तर स्त्रियांची संख्यासुद्धा जास्त होती. त्यामुळे त्यांच्यासमोर अनेक प्रश्न पडत होते. ते कदाचित रशियन कम्युनिस्टांमध्ये पडत नसतील. कारण अनेक ठिकाणी लेनिनने असं म्हटलं की आता पोलिटीकल पावरचा संघर्ष आहे. बाकी सगळे प्रश्न आपण नंतर सोडवू. पण जर्मन कम्युनिस्ट स्त्री नेतृत्वाने अशी भूमिका घेतली नाही. ८ मार्च १९१० च्या दुसऱ्या इंटरनॅशनलमध्ये रोझा लक्झंबरने ठराव आणला. त्यात तिने दोन भूमिका घेतल्या. एक : समान कामाला समान वेतन मिळालं पाहिजे. कारण तोपर्यंत कारखान्यात जात असल्या तरी स्त्रियांना समान वेतन मिळत नव्हतं. दोन : आम्ही व्यक्ती आहोत, तेव्हा तुम्ही आमचं व्यक्ती म्हणून आणि स्त्री म्हणूनचं स्वातंत्र्य पहिल्यांदा मान्य केलं पाहिजे. या ठरावाने आणखी दोन गोष्टी केल्या. मार्क्सची भूमिका आहे की 'आम्ही व्यक्ती आहोत'. जर आम्ही व्यक्ती असू तर कष्ट करणाऱ्या सगळ्या व्यक्तींचे कष्ट हे समान मानले गेले पाहिजेत. त्यानुसार त्यांना समान दामही दिला गेला पाहिजे. दुसरी गोष्ट स्त्रीपुरुष असा भेद करता कामा नये. असं म्हणत असताना रोझाने हे पण अधोरेखित केलं की स्त्रिया म्हणून आमचे काही प्रश्न आहेत आणि पुरुषांपेक्षा वेगळे आहेत. ते शारीरिक, मानसिक, भावनिक वगैरे असू शकतील, पण ते वेगळे आहेत हे तुम्हाला मान्य केलं पाहिजे. ही युरोपातील १९०० व्या शतकातील सॅफ्रोजेट चळवळ...म्हणजे कम्युनिस्ट चळवळीने मार्क्सपासून रोझा लक्झंबरपर्यंत ज्या भूमिका घेतल्या त्याने पहिल्यांदा स्त्रीमुक्तीचा युरोपातला पाया घातला.

युरोपात स्त्रियांना व्यक्ती म्हणून स्थान नव्हतं. 'बायबल' आणि 'कुराण' यांची जी पुराणं आहेत ते काय म्हणतात, की पहिल्या दिवशी ईश्वरानं पृथ्वी निर्माण केली, मग निसर्ग वगैरे निर्माण केला. मग माणूस- पुरुष निर्माण केला. त्या पुरुषाला कंटाळा येऊ नये म्हणून त्याच्या बरगडीपासून स्त्री निर्माण केली. ही भूमिका जरा नीट लक्षात घ्या. स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नाही. शारीरिकदृष्ट्या सुद्धा ती पुरुषाचा भाग आहे, असं या तिन्ही धर्मांचे पुराणशास्त्रे मानतात. पुढं असं आहे की देवानं सांगितलं होतं की बागेतलं कुठलंही फळ खायचं नाही म्हणून. आणि ती तर हट्ट करून बसली. म्हणजे एकतर ती पुरुषापासून निर्माण झाली, शिवाय तिनं हट्ट केला. आणि तिच्या हट्टामुळे पुरुषाला पाप करावं लागलं. म्हणजे पापाचं मूळ कोण तर बाई. बाई ही पापयोनी ठरवली गेली. या सगळ्या मिथकांचा युरोपियन समाजावर एक जबरदस्त पगडा आहे. धर्मसत्ता नावाची भानगड

तिथे प्रमुख होती. आणि राज्यसत्ता त्याला पूरक होती. त्यामुळे तिथल्या सगळ्या संस्थांवर याचा एक पगडा आहे. म्हणून मार्क्स हा असा पहिला माणूस आहे की तो म्हणतो 'आम्ही बाईला व्यक्ती मानतो.' स्त्रीवादाच्या संदर्भातला युरोपियन समाज विकसित होताना त्याच्या दृष्टिकोनात पडलेला फरक लक्षात घ्या.

आपल्याकडे अशी एकल परिस्थिती नाही. हा देश लिंगपूजक आहे. लिंगपूजा ही शिव आहे, म्हणजे पवित्र आहे. सगळ्यात पवित्र गोष्ट काय आहे तर, लिंग आणि योनी यांचा संभोग. त्यामुळे इथे फिलॉसॉफिकली स्त्री पापयोनी समजली जात नव्हती. म्हणजे जो पापयोनी म्हणूनचा कॅथलिक परिणाम तिथं आहे, तो इथे नाही. इस्लाममध्ये पैगंबरांनी यापासून गांभिर्यानं फारकत घेतली. पुराणशास्त्र जरी ही असली तरी पैगंबर असं मानत नाहीत. आता आपला तो विषय नाही. ग्रिक पुराणं घेतली तर तिथल्या सगळ्या देवता ह्या दुय्यम आहेत. म्हणून युरोपात मातृभूमी (मदरलँड) हा शब्द येत नाही, तर पितृभूमी (फादरलँड) हा शब्द येतो. मातृभूमी का नाही? कारण तिथं फादर हाच महत्त्वाचा आहे. चर्चमध्येसुद्धा फादरच महत्त्वाचा आहे, नन नाही. देश फादरलँड, चर्चमध्ये फादर महत्त्वाचा, ह्या काही अपघाताने घडणाऱ्या गोष्टी नाहीत. आपल्याकडे लिंगपूजा आहे. म्हणजे ब्राह्मणांनी, सनातन्यांनी, वैदिकांनी असा दावा केला की 'आमचाच मतप्रवाह बरोबर.' हे काही इथल्या लोकांनी मान्य केलं नाही. ते जर मानलं असतं तर जैन नागडे कसे काय फिरले असते? ते जर मानलं असतं तर बुद्ध निर्माणच झाला नसता, ते जर मानलं असतं तर सगळी भक्ती चळवळच निर्माण झाली नसती. सगळ्या भक्तीमध्ये भयंकर मोठा विद्रोह काय आहे? तर सगळ्या स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनं आहेत. महदाइसा-चक्रधर, मुक्ताबाई-ज्ञानेश्वर, जनाबाई-नामदेव, बहिणाबाई-तुकाराम इ. म्हणजे पारडं समान आहे. कॉइन कोण करतंय? 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' असं तुकाराम म्हणत नाही काही तर बहिणाबाई म्हणते. आपल्याकडे असं एकच एक मोनोलिथ नाही. इस्लाम मोनोलिथी नाही, पण युरोपमध्ये जो इस्लाम गेला तो ज्यूडाइझमची, ख्रिश्चॅनिटीच्या प्रतिक्रियेमधून. आपल्याकडे कधीही मोनोलिथ नव्हतं. एक बहुआयामी समाज आहे. त्याचे बहुआयामी स्वरूप समजून घेतले पाहिजे. त्यामुळे इथे ग्रामदेवता आहे, आदिमाता आहे. अशा कोणत्याही संकल्पना युरोपमध्ये नाहीत. या सगळ्या संकल्पनांचा मानसिकता नावाच्या गोष्टीवर काही परिणाम होतो का? तर होतो. जसं युरोपमध्ये पक्कं आहे की मानसिकतेमध्येच दुय्यमत्व आहे.

आपल्याकडे दुय्यमत्व लादणारं सगळ्यात चांगलं उदाहरण म्हणजे रामायण. रामायणातल्या स्त्रिया कुठे ऐकतात? कैकयी ऐकते? ती निर्णायक भूमिका घेते म्हणून तर रामाला वनवासाला जावं लागतं. सीता ऐकते? नाही ऐकत. ती रामाला सोडते. पहिल्यांदा राम सोडतो तिला. नंतर पश्चात्ताप झाल्यावर तो परत येतो तेव्हा ती त्याला नाही म्हणते आणि मग धरणीत जाते. ग्रिकमध्ये अशी एकही कथा नाही. होमरचं इलियड आहे. याच्यावर ब्रॅड पिटचा 'हेलन ऑफ ट्रॉय' हा खूप चांगला सिनेमा आहे. स्त्रियांचं काय आहे त्यात? तर ती एक वस्तू आहे. ती एका पुरुषापासून दुसऱ्या पुरुषाकडे जाणार आहे. एका पुरुषापासून दुसऱ्या पुरुषापर्यंतच्या प्रवासात त्या बाईला काही अस्तित्व नाही. तिचं देखणं असणं एवढाच मुद्दा आहे. याउलट आपल्याकडच्या रामायणात वेगळीच परिस्थिती आहे. म्हणजे दशरथ हा नपुंसक आहे. बीज- शुक्राणू दुसऱ्याकडून उधार घ्यावे लागतात. महाभारत तर अगदीच बंडखोर आहे. विचित्रविर्यापासून ते पंडूपर्यंत सगळे राजे नपुंसक आहेत. जो पुरुष नपुंसक नाही तो अविवाहित - ब्रह्मचारी आहे- भिष्म. सगळे शुक्राणू उधार. दुसऱ्या बाजूला त्या आंधळ्याची बायको म्हणून भिष्माने ब्लॅकमेल करून आणलंय- त्याचं तोंड बघयाचं नाही म्हणून डोळ्यावर पट्टी आहे. आणि त्याच्यापासून गर्भ राहिला म्हटल्यावर पोटावर बुक्की मारून घेते. त्या गर्भाचे शंभर तुकडे होतात म्हणून ते शंभर पुत्र आहेत. म्हणजे इथं स्त्रियांनी शांतपणे काही सहन केलंय अशी काही भानगड नाहीय. म्हणजे महाभारतातल्या

सगळ्या स्त्रिया बंड करतायत. आणखी एक गोष्ट आहे, ह्या बंडखोर स्त्रिया आणि शूद्र कृष्ण असा अलायन्स आहे. महात्मा फुले जे म्हणतात की स्त्रीशूद्रादिशूद्र ही भूमिका बेसिकली महाभारत मांडतंय ना. दोन वर्णांचा तो नाश करतो आणि शूद्र कृष्ण आणि स्त्रिया यांची युती उभा करतो. आता हा इंटरप्रिटेशनचा मुद्दा आहे. आपल्याकडे इतिहासाचं इंअरप्रिटेशनच झालेलं नसल्याने हा मुद्दा तेवढा पुढे सरकलेला नाही. पण आपण तो मांडला पाहिजे ना. दोन समाजाची वेगळी मानसिकता असा एक प्रश्न आहे. आता या मानसिकता कशा आल्या असतील? शरद पाटलांनीच विनयपिटकामधली मेंढकाची पहिली कथा सांगितली आहे, त्यात शरद पाटील पंचसूत्रीपर्यंत थांबलेले आहेत. पुढे? त्याच विनयपिटकामध्ये वेत्तन असा शब्द आलेला आहे. आपण जर बारकाईनं पाहिलं तर भारतामधला सगळा संघर्ष हा वेतन की वतन असा आहे. विनयपिटकामध्ये, दिघ्घनिकायमध्ये वेतन असा शब्द आलेला असेल तर वेतन ही युरोपियन दृष्टीनुसार मॉडर्न संकल्पना आहे. आणि आपल्याकडे ती इसपूर्व ६२५ मध्ये आलेली आहे. त्या वेतनाने जे सरप्लस निर्माण होतं, जी संपत्ती निर्माण होते त्याच्या मोहाने सिकंदर रोमपासून इथंपर्यंत येतो. तो संपूर्ण कालखंड बघितला तर सिकंदरपासून हून, शक, तुर्क, अफगाण, मोगल, इंग्रज आणि चीन, जपान. जगामध्ये कोणत्याही देशात सरप्लसच्या- संपत्तीच्या मोहाने अशी वन वे ट्रॅफिक झाली नाही.

युरोपियन मंडळींमध्ये आणि त्यापूर्वी आलेल्या मंडळींमध्ये एक फरक आहे. त्यापूर्वी आलेले लोक भारतीय समाजाचा घटक झाला. म्हणजे कोणी स्वत:ला जाट म्हणवून घेतलं, कोणी रजपूत म्हणवून घेतलं. शकांचे जाट झाले आणि हुनांचे रजपूत झाले. यूपीमध्ये मुरादाबाद नावाचं शहर आहे तिथून बरेलीजवळ चंदोसी नावाचं शहर आहे. तिथपर्यंत जर मधल्या रस्त्याने आपण गेलो तर अनेक गावं ही तुर्कांची गावं आहेत. बाहेरून जे तुर्क इथं आले नि तसेच वसले. शेती करतात. आज १२०० वर्षांनंतरही ती गावं तुर्कांची गावं म्हणूनच ओळखली जातात. तसंच जाटांचीच गावं. इथल्या संस्कृतीचा ते लोक भाग झाले म्हणजे नेमकं काय झालं तर इथली उत्पादनव्यवस्था त्यांनी आत्मसात केली. म्हणजे काय झालं, यातच स्त्रीप्रश्नाच्या घडणीचं कारण दडलेलं आहे. चाणाक्यानं गण फोडले.

चाणाक्याचं अर्थशास्त्र म्हणजे काय आहे, तर तो सगळे गण उद्‌ध्वस्त करतो आणि गावं वसवतो. चाणाक्याच्या ह्या रोलबद्दल कुणीच बोलत नाही. आमचं जे गाव आहे त्याच्या बरोबर मध्ये एक गढी आहे. गढीच्या उजव्या बाजूला वाणी, ब्राह्मण, सोनार आणि डाव्या बाजूला बारा बलुतेदार आहेत. गावाचं वसणं कसं आहे हे लक्षात घ्या. गढी कुणबी-पाटलाची/माळी पाटलाची/धनगर पाटलाची आहे. शेतीला ताबडतोब काय लागतं तर नांगर लागतो, तर लोहार-सुतार बाजूला. चांभार-मांगही डाव्या बाजूलाच, पण नदीच्या जवळ आहेत. कारण घायपात कुजवायला नदीचं पाणी लागतं. चामडं कुजवायलाही पाणी लागतं. म्हणून पाण्याच्या स्रोताशेजारी चांभार-मांग-ढोर यांची वस्ती आहे. यांच्यामध्ये मग गुरव, शिंपी, कुंभार, गवळी, तेली, बेलदार, गवंडी ह्या सगळ्या उत्पादक जाती. हे सगळं अतिशय महत्त्वाचं आहे. आता हे चाणाक्यानं वसवलेलं प्रारूप आहे.

आधुनिक फॅक्टरीमध्ये काय असतं? तर तिथं शॉप्स असतात. उदा. वेल्डिंग शॉप, मशिन शॉप, टर्नर शॉप, फिटर शॉप. फॅक्टरीमध्ये त्या त्या शॉपचा कामगार दुसऱ्या फिल्डचं काम करायला जात नाही. म्हणजे मशिनिस्ट मशिनीचंच काम करतो, वेल्डर वेल्डिंगचंच काम करतो. प्रत्येक जण आपापलं काम बघतात. आता गावांची रचना बघा. शेतिकेंद्रित गावातही फॅक्टरीसारखंच हे सर्व आहे. भारतातलं शेतिकेंद्रित प्रत्येक गाव. इथं आपण शरद पाटलांना क्रॉस केलं. शरद पाटील चाणाक्यानं गणं तोडले आणि गावं वसवली असं ते सांगतात. त्या गावांचं वसणं हे शेतिपूरक उत्पादन-व्यवस्थेचं वसणं आहे असं ते सांगत नाहीत. कारण हा राजकीय अर्थशास्त्राचा (पॉलिटिकल इकॉनॉमी) भाग आहे. गावात

जसं प्रत्येकाचं काम विभागलेलं आहे, हीच व्यवस्था मॉडर्न फॅक्टरीमध्ये आहे. म्हणजे गाव नावाची शेतिकेंद्रित फॅक्टरी. आता याच्यात सरप्लस कसं मोजणार? या सगळ्या गावांना गढ्या आहेत, कोट आहेत. कोट बेलदार बांधतात. देऊळ बांधणारे ते सगर आणि गवंडी असतात. देवळाचा घुमट सगर बांधतो. आता हे बांधायला सरप्लस असायला हवं ना. म्हणजे सगळंच्या सरप्लस युरोपसारखं वर राजाकडं जात नाही. एका बाजूला शेतिकेंद्रित फॅक्टऱ्या गावांच्या रूपानं चाणाक्य वसवतो. त्याच वेळी तो आपल्या अर्थशास्त्रातून वेल्फेअर स्टेटची संकल्पना मांडतो, की दुष्काळात राजानं काय केलं पाहिजे. आपली कोठारं उघडली पाहिजेत. शेतकऱ्यांना शिदा, बियाणं, जनावरं, पाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

युरोपमध्ये ही काही भानगड नाही. तिथं चर्चने चर्चेस बांधली आहेत. राजांनी, सरदारांनी महालं बांधलेली आहेत. बाकी काहीच केलं नाही. ह्या शेतिकेंद्रित फॅक्टरीमध्ये कामगार म्हणून स्त्रियाही आहेत. त्यांना अदृश्य नाही केलेलं. म्हणून देव्या आहेत ना. लिंग आहे आणि देवी आहेत. प्रत्येक गावाला गावदेवताच-ग्रामदेवताच आहेत आपल्याकडे. याचा मानसिकता म्हणून काही परिणाम आहे ना. सगळे पुरुष त्या देवतेला पूजत असतात आणि ही देवता तर स्त्री आहे. घरातली प्रत्येक आई...काय होतं तिचं...त्याचा परिणाम काय होतो. आणि मग प्रत्येक आई होणारी बाई काय नातं असेल. युरोपातलं पुरुषाच्या बरगडीकेंद्रित मिथक आणि त्या मिथकाच्या आधारानं उभं राहिलेलं मोनोलिथ, आणि लिंगपूजक, निसर्गपूजक, स्त्रीपूजक समाजातल्या स्त्रीपुरुष नात्याच्या संकल्पना, असा विचार करायला आपण सुरुवात केली तर मग समोर काय येतं- यात आदिवासी समाज घेतलेला नाही अजून. जगातल्या सगळ्या आदिवासी समाजाने स्त्रीपुरुष विषमता कधीही स्वीकारली नाही. आणि भारत हे भयंकर प्रतीकात्मक प्रकरण आहे, या अर्थाने की इथं अजूनही एकतृतीयांश भूभागामध्ये आदिवासी राहतात ना. त्याने नाही स्वीकारला विषमतेची मुळे पण इथला जो तथाकथित नागर झालेला समाज आहे गावात वस्त्या करून राहणारा, त्याची काय परिस्थिती आहे? याला अपवाद पुरुषसुक्त मानणारे ब्राह्मण झाले. थिअरीटिकल पोझिशन आहे ना त्यांची. इथं एका बाजूला पुरुषसूक्तचा प्रवाह आहे, तर दुसऱ्या बाजूला लिंगापासून देवांच्या पूजा करणारा प्रवाह आहे आणि तिसऱ्या बाजूला सगळंच नाकारणारा प्रवाह आहे. जैन, बौद्ध, सांख्य, चार्वाक, लोकायत सगळंच नाकारतात. इथली साइक म्हणून या सगळ्यांचे परिणाम काय आहेत? एका मोनोलिथची मानसिक आणि जिथं मोनोलिथ बनलंच नव्हतं...इथं सगळे समांतर प्रवाह आहेत एकमेकांना छेदणारे. ते प्रवाह जिवंत आहेत. त्याच्यात जीवघेण्या लढाया आहेत. म्हणजे ब्राह्मणांनी संधी मिळाली तेव्हा बौद्धांची कत्तलच करून टाकली. संधी मिळाल्याबरोबर शैवांनी जैनांची कत्तलच करून टाकली. दक्षिण भारतातला सगळा दिगंबर जैन पंथ जवळपास नष्ट झाला होता. इंग्रज आल्यानंतर तो पुनरुज्जीवित झाला. त्यांच्या नष्ट होण्यामुळे इथलं थांबलं का सगळं? नाही. कारण भक्ती पंथाच्या रूपाने समतावादी प्रवाहाने जोरदार पुनरागमन केले. त्याने उदारमतवादाचा झेंडा जो बुद्धाच्या काळापासून आला जो अशोकाने हाती घेतला. चाणाक्यसुद्धा त्या अर्थाने ब्राह्मण नाही. तो लिबरल आहे. याच्यामध्ये आपल्याकडे जे सोशल फॉर्मेशन होतंय जात-वर्ण नावाचं, आधी कौशल्य विकसित झाल्यानंतर- चाणाक्याची गावं ही जातींची गावं आहेत. त्या अर्थाने जात म्हणजे ती फॅक्टरी व्यवस्था आहे. अशी आतापर्यंत कल्पना केलेली नाही. युरोप सारखं ते पुरुषकेंद्रित नाही. त्यामुळे येथे स्त्रियांच्या मुद्द्यांचा एक समांतर प्रवाह आहे. याचा अर्थ असा नव्हे की ते सर्व आलबेल होतं. पुरुषसत्ता, ब्राह्मण्य आणि स्त्रियांची गुलामगिरी हे आपल्याकडे एका अर्थाचे शब्द आहेत. युरोपमध्ये जशा माद्या केल्या तशा इथल्या उच्चवर्णियांनी त्यांच्या स्त्रियांच्या माद्याच केल्या. अशा मादीकरण झालेल्या स्त्रियांचे प्रश्न वेगळे आणि त्या मादीकरणाच्या प्रक्रियेमध्ये इथल्या उत्पादनव्यवस्थेच्या अंगभूत गरजेपोटी मादीकरणाच्या प्रक्रियेत न गेलेल्या स्त्रिया, असा आपल्याकडे विचार करावा लागेल. हा विचार

करताना आणखी एक गोष्ट चिंतनाच्या पातळीवर करावी लागेल की मादीकरण झालेल्या स्त्रियांचे मुद्दे काय आहेत? मादीकरण न झालेल्या स्त्रियांचे मुद्दे काय आहेत? असा सरळ भेद आहे. अशाप्रकारे आपल्याकडे चर्चाच झाली नाही. मादीकरण झालेल्या सगळ्या स्त्रियांच्या चळवळी या अस्मितादर्शी चळवळी होत्या. त्याच्यात पुरुष म्हणजे शत्रूच. युरोपमधल्या स्त्रीचं मादीकरण काय आणि इथल्या स्त्रीचं मादीकरण काय, शेवटी ते मादीकरणच. भांडवलशाहीनं त्या माद्यांचं वस्तुकरण करून टाकलं. भांडवलशाहीच्या पूर्वी मादी ही कुणाच्या तरी एका मालकीची होती. मध्ययुगामध्ये सरदार लढाईला जाताना आपल्या बायकोच्या योनीला कुलूप लावायचे. कमरपट्टा नावाचं प्रकरण हे त्याच्यातून आलेलं आहे. हे काय आहे? भांडवलशाही ही मार्केट इकॉनॉमीवर आधारलेली असल्यामुळे सगळ्या वस्तू ह्या सार्वजनिक असतात. म्हणजे आता माद्या कुणाच्या मालकीच्या नाहीत. कुठलीही वस्तू कुणाच्या मालकीची नाही. कारण बाजारात आहे ना ती. ह्या मालकीच्या माद्यांपासून बाजारातल्या वस्तू असा जो प्रवास आहे याच्यात एक मुक्तिवादी भ्रम आहे. की मी कुणाच्या मालकीची नाही राहिले आता. हा भ्रम कुठपर्यंत जातो तर आता लोक वेश्या नाही म्हणत, तर सेक्सवर्कर असं म्हणतात. वेश्येचं सेक्सवर्कर होणं हे या मुक्तिवादी भ्रमातून येणाऱ्या गोष्टी आहेत. कालच्या व्यवस्थेमध्ये ज्यांच्या श्रमाशिवाय अर्थव्यवस्थेचा, समाजव्यवस्थेचा गाडा पुढं सरकूच शकत नव्हता त्यांचं व्यक्तित्व असणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न पाहिले पाहिजेत. आता त्यांचं झपाट्यानं मादीकरण व्हायला लागलं आहे.

कारण जागतिकीकरण नावानं आलेल्या नव्या व्यवस्थेनं, तंत्रज्ञानाने सगळ्या स्त्रियांना अकुशल करायला सुरुवात केलेली आहे. ती अकुशल झाल्याबरोबर तिच्या वस्तुकरणाशिवाय काही पर्याय राहत नाही. मधल्या काळात समाजवादाच्या रेट्यामुळे भांडवलशाहीची गती मंद होती. या मंद होण्याच्या काळात त्या टप्प्या टप्प्याने स्त्रीपुरुष दोघेही अकुशलीकरणाकडे जात होते. म्हणजे पहिल्यांदा टेक्सटाईल्सच्या संबंधित लोक गेले, नंतर इंजिनिअरींगमुळे लोहार, सुतार, गवंडी, प्लास्टिकमुळे कुंभार, चांभार, रबर व नायलॉनमुळे मांग, चांभार अशा अनेक जाती अकुशलीकरणाकडे ढकलल्या गेल्या. या प्रक्रियेत त्या त्या जातीतला एकेक विभाग या भांडवली व्यवस्थेमध्ये समाविष्टही होत गेला. विशेषत: पुरुष. काहीप्रमाणात स्त्रियाही झाल्या. त्या कामगार, क्लार्क, वकील, डॉक्टर वगैरे झाल्या. या शहरीकरणाच्या प्रक्रियेत पुरुषांबरोबरच स्त्रियाही ढकलल्या गेल्या.

बहुजन समाजातले जे स्त्रीपुरुष तिकडे ढकलले गेले त्यांच्याकडे सांस्कृतिक आदर्श काय होता? कारण यांचे सर्व आदर्श जुन्या शेतिकेंद्रित बंडांशी निगडित होते. आता नव्या काळात काहीच नाही. म्हणजे जुनी नाळ तुटली. या पोकळीमध्ये सगळ्या ब्राह्मणी संकल्पना- ज्या मूलत: कॅथलिक संकल्पना आहेत. आपल्याकडे हिंदुत्वाच्या नावाने येणाऱ्या सर्व संकल्पना या कॅथलिक संकल्पनांची भ्रष्ट कॉपी आहे. म्हणजे कॅथलिक संकल्पनाच ते भगव्या पॅकिंगमध्ये गुंडाळून देतायत. त्यामुळे स्त्रीवादाचा, स्त्रीमुक्ती चळवळीचा, स्त्री प्रश्नांचा, स्त्री मानसिकतेचा विचार करताना हे सर्व मुद्दे निट विचारात घेतले पाहिजेत. मोठ्याप्रमाणात औदासिन्य येतं आहे. अकुशलीकरणाने महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला की जोपर्यंत कौशल्य होतं तोपर्यंत कौशल्याशी निगडित तिचं व्यक्तिमत्त्व होतं, परंतु जसं अकुशलीकरण झालं तसं हे कौशल्याबरोबर ते व्यक्तिमत्त्वही संपलं आणि चेहराविहिनता आली. पहिला प्रश्न पडतो की मी कोण आहे आणि माझ्या जन्माचं प्रयोजन काय आहे? आणि याची उत्तरं जेव्हा मिळत नाहीत तेव्हा मग डिप्रेशन येतं. अशी आताची दोरी तुटलेल्या पतंगासारखी प्रत्येक स्त्रीपुरुषाची अवस्था आहे. यात सर्वांत जास्त बळी हा स्त्रियांचा जातो आहे. कारण पुरुष कुठं तरी समाविष्ट होतो तरी, खोट्या-भ्रामक आयडेंटिटीज मिळवतो, पण स्त्रियांना तेही करता येत नाही. कारण घर कितीही मोठं असलं तरी तिची अकुशलीकरणामुळे झालेली परिस्थिती काही बदलत नाही. भूमिका तिच असते ना.

■

सगळ्याच बाबतीत प्रचंड उलथापालथ. बदल. सगळं जगच नवीन, विकत आणल्यासारख!! असं खरंच असतं का? बदल एका दिवसात घडतात का? बदलण्याची काय पद्धत असते? कोणत्या गतीने बदल घडत जातात? बदलाला कोणकोणते घटक जबाबदार असतात ती कारण? ते प्रश्न? त्यांची मुळं?

१९७५ च्या दरम्यान लग्न झालेल्या बहुजन कुणबी मराठा शेतकरी घराण्यातील मुली. खेड्यातलं बालपण- मोकळी हवा-पाणी. घरचं अन्नधान्य-दूधदुभतं- भाजीपाला. ऋतुमानाप्रमाणे मिळणारी फळं-बाजार-दुकानं खूप दूर. बहुजन, कुणबी, मराठा शेतकरी कुटुंबातली मुलं-मुली. जिल्हा परिषदेच्या गावातल्या शाळेत जायला लागलेली. गावात पाचवी-सातवीपर्यंत शाळा. मुलं बऱ्यापैकी शिकून तालुक्याला हायस्कुलात जायला लागलेली. हुशार असणारी पुढं कॉलेजातही जाऊ लागली. ग्रॅज्युएट झालेली फौजदार, वकील, मास्तर, प्रोफेसर,

गावात सकाळची शाळा करून घरात-रानात मुली कामाला मदत करत. उन्हाळ्याच्या सुट्टीत पापड्या-कुरडया-शेवया-सांडगे-वडे-मिरच्या-लोणची-मसाले सगळ्या कामात त्यांचा सहभाग असे. रोज एकमेकीच्या घरी मदतीला जावे लागे. वासरांना पाणी पाजणे, सडा-रांगोळ्या, जळण-काटक्या गोळा करून आणणे, पाणी आणणे, लहान भावंडांना, आत्याच्या, मोठ्या भावंडांच्या मुलांना सांभाळणे, स्वयंपाकात मदत करणे हे सगळं करून सूर मारून पोहायला जाणे, सूरपारंब्या, लपाछप्या, ओढ्याकाठी पांदीमधे करवंद, बोरं, कैऱ्या शोधत फिरणं सकाळ-संध्याकाळ धारा काढायला मदत करणे.

आषाढ-श्रावणातील खेळ, दसरा-दिवाळीचा काळ सदैव उत्साही- पंधरा ऑगस्ट - २६ जानेवारी - वक्तृत्व-भाषण-झेंडावंदन सगळं करून कंदील-चिमण्यांच्या उजेडात अभ्यास करत बसायच्या. निबंध लिहायचे. मेंदीची पाने दगडावर वाटून त्यात हात रंगवायचे. वर्षातून

# रिकामी चौकट

इचारात सगुणा

जास्त हुशार असणारे इंजिनिअर, डॉक्टर व्हायला लागलेले. सरकारी नोकऱ्यांमध्ये जाऊ लागली. या शिक्षित मुलांनी लग्नासाठी शिकलेल्या मुलींची मागणी सुरू केली. आई-वडिलांना मुली शिकून शहरात जातील, सुखात राहतील असं वाटू लागलं. यातून मग मुलींना पाचवी-सातवीच्या पुढे रेटायला सुरुवात झाली. जवळच्या तालुक्याच्या-जिल्ह्याच्या ठिकाणी नातेवाइकांकडे, नाही तर घर करून मुलांची-मुलींची शिक्षणं सुरू झाली. मोठ्या एकत्र कुटुंबातील दोनचार जावांमधली एखादी जाऊ-आजी-आत्या कोणाला तरी खोली करून तिच्याजवळ मुलांना ठेवलं जायचं. पुरुषमाणूस येऊन जाऊन शेती बघायचे. गावाकडून सगळं सामान यायचं.

एकदा-दोनदाच मिळणारे नवीन कपडे म्हणजे परकर-पोलके - कधीतरी मिळणारी चप्पल, केसांना-वेण्यांना बांधायला लाल किंवा काळ्या रिबन. कपाळाला गंध, हातात काचेच्या बांगड्या - प्रचंड उत्साह. सतत काम, उद्योग, अभ्यास. कणखर सुदृढ शरीर. निरोगी मनं. बांगड्यांच्या काचा, चिंचोके, गजगे, गारगोट्या, दगड यांच्या मदतीने खेळ. गौरी-गणपती-महालक्ष्मी, नवरात्रातली, दिवाळीतली दगडमातीच्या सजावटी, चिपाडांच्या कलाकृती, चूल-बोळक्याच्या भातुकल्या, कैकाडी, पारधी, घिसाडी, डोंबारी, पोतराज, नंदीबैलवाला, मसनजोगी, या सगळ्यामधल्या मैत्रीणी, त्यांचे खेळ-गाणी-चालीरिती सगळ्याचा मिळून एक मोठ्ठा गोफ.

त्याची घट्ट विण...या सगळ्यातून पाचवी-सातवीतून जवळच्या हायस्कूलच्या ठिकाणी रवानगी बैलगाडीतून, एसटीबसमधून. जरा बरा बागायतदार असला तर जीपमधून पुढचं शिक्षण सुरू.

इथंही घरातलं सगळं आवरून केस चापून-चोपून दोन वेण्या. आठवीपासून साड्यांचा गणवेश. खाली मान घालून सरळ घरी यायचं. नवीन शाळा, मास्तर-मास्तरणी, मैत्रीणी सगळ्यांशी जुळवून घ्यायचे. गावातून आणलेली भाषा, शिव्या, अंगातली रग सगळ्यांवर नियंत्रण ठेवत अभ्यासात लक्ष घालायचे. शाळेतल्या स्पर्धा, गॅदरींग, खेळ सगळ्यात चोरून भाग घ्यायचा. कारण घरातून परवानगी मिळेलच असे नाही. सहली, परगावी स्पर्धेसाठी जाणं यासाठी तर घरी न विचारताच नाही म्हणून सांगायचं. कारण घरातून परवानगी मिळणार नाही याची खात्रीच. शाळेतून घरात पोहोचलं की घरातल्या सगळ्या कामाला हातभार. नाहीतर ती वळण लावायला जी कोणी काकू-आई-बहीण असेल तिचा पट्टा सुरू.

यांच्याबरोबर शिकणाऱ्या भावांना शिकवण्या, तालमी, खुराक, सुरू असायचा. घरातल्या कसल्याही कामाला धक्कासुद्धा लावायचे नाहीत. सायकली घेऊन दिवसभर फिरायचे. सगळ्या सोयी, लाड तरीही अभ्यास आणि मार्कांचा फारसा उजेड पडायचा नाही. दहावी पास व्हायची बोंबाबोंब! एकदोन गटांगळ्या खाल्याशिवाय बाहेर यायचं नाहीत. दहात एखादाच मन लावून करायचा. मुली मात्र सगळ्या अभ्यास करून पास व्हायच्या. या बहिणींवर लक्ष ठेवण्याची मोठी जबाबदारी मात्र हे भाऊ पार पाडायचे. सणवार-पै-पाहुणा सगळ्यांना तोंड देत मुलींचं शिक्षण चालायचं.

आठवी-नववीतच स्थळं यायला सुरुवात व्हायची. स्थळ बरं असेल तर हातातोंडाशी आलेली परीक्षासुद्धा देता यायची नाही. लग्न ठरलं की आख्खं वर्ष पाण्यात. रडून-बोंबलून काही उपयोग व्हायचा नाही. सात-आठ-नऊ-दहा वर्षांच अंतर सहज असायचं. शिकून नोकरी-उद्योगवाला असेल तर धन्य. सगळेच खुशीत. मुलीही नवीन कपडे-दागीने-धावपळ-लगबगीत सगळं विसरून जायच्या. चौदा-पंधरा-सोळाचं वय. भेदरून-बावरून काय कुठं चूक-बरोबर हो-नाही काही कळायच्या आत लग्न लागून जायचं. हरखून-गोंधळलेल्या अवस्थेत सासरी रवानगी व्हायची. नवीन घरात नवीन सून खूप मानाची. कारण नोकरदाराची बायको. तिला शेतात जायची गरज नाही. तिला फार बरोबरीनं कोणी कामंही सांगायची नाहीत. तिच्या बापानं भरपूर हुंडा-मानपान-दागदागीने-भांडीकुंडी दिलेली असत. त्या दडपणाखाली सासर दबून असे. नकळत तिची श्रमापासून-माहेर-सासर यापासून हळूहळू फारकत व्हायला सुरुवात होते. आपण थोड्याशा वेगळ्या ही भावनाही हळूहळू अहंकार जोपासू लागते.

नवऱ्याबरोबर नोकरीच्या ठिकाणी या मुली वावरू लागतात. सुरुवातीचे दिवस नवीन संसार लावणे, नवीन शिकणे वातावरणात स्वता:ला रूळवत राहत. नवरा पूर्णवेळ कामात. घरात फोन-मोबाईल त्या काळात जवळ-जवळ नव्हतेच. पत्र पंधरा-पंधरा दिवस मिळत नसत. टीव्ही अजून सगळीकडे पोहोचला नव्हता. छोटी घरं आवरायला, स्वयंपाक, थोडाफार बाजारहाट, गावाकडून येणारे पाहुणेरावळे यामध्येच स्वत:ला गुंतवत. पुढे मुलं. त्यांची शिक्षण-नोकऱ्या-लग्न सगळं चाळीस-पंचेचाळीशीपर्यंत पूर्ण. या वीस-पंचवीस वर्षांमध्ये कितीजणींनी स्वत:ची शिक्षणं पूर्ण केली असतील, किती छंद जोपासले असतील? कशामध्ये स्वत:ला गुंतवले असेल? अतिशय साफ-सुंदर घरं, काटकसरीने संसार, पैसे वाचवून वाचवून केलेले दागिने-घरसामानं यापलीकडचं सामाजिक भान, राजकारण, समाजकारण यामधला जबाबदारीचा सहभाग?

नवरा कामात गुंतलेला. मुलं मोठी स्वावलंबी झालेली. अर्धवट शिक्षण. त्यातून येणारे न्यूनगंड किंवा उद्धट अहंकार या सगळ्याची जबाबदारी-दोष कोणाचा?

महिलामंडळं, भिशी-किटी, बाबा-बापू-माता, सद्गुरू-सत्संग, बैठका, नामजप-कर्मकांड-अंधश्रद्धा-देवधर्म-शांतता-अलिप्तता...

अवतीभवती घडणाऱ्या घडामोडी-सामाजिक-राजकीय-नैसर्गिक-आर्थिक उलथापालथी, अन्याय,

जुलुम, जबरदस्ती कशाचाही कसलाही ओरखडाही उमटू न देता साधलेली अलिप्तता, सुरक्षितता?

खळखळत्या-सळसळत्या-लखलखत्या उर्जेचं हे कशात रूपांतर झालंय? रसरसून झोकून जगणाऱ्या, खळखळून हसणाऱ्या, आव्हान स्वीकारणाऱ्या, मोठमोठ्या जबाबदाऱ्या पेलू शकणाऱ्या लढे, संघर्ष, उभ्या करणाऱ्या या विजांचे हे थंड दगड भावनाशून्य, क्रूर! दरवाजे बंद करून भासात शांतता जपणारे, निरुपद्रवी, सात्विक...? हे बदल कसे घडले? अचानक? आजच्या बाजाराचे सगळ्यात मोठे गिऱ्हाईक धर्मसंस्थेच्या संस्कृतीचे ओझे बाळगणारे, यांच्या सुरक्षिततेच्या संकल्पना यांच्यावर बिंबवून त्याद्वारे सदैव यांना ब्लॅकमेल करणारी सगळी भांडवली व्यवस्था आणि समाजाचा एक मोठा हिस्सा 'न्यूट्रल' करून त्याला अलिप्त करणारी संधीसाधू राज्यव्यवस्था!

माध्यमं काय दाखवतील ते बघणे, काय छापतील ते वाचणे! सगळ्या विश्वात घडणाऱ्या घटना, स्त्रीविश्वातल्या उलथापालथी कशाचाही विचार न करता आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांशी आपला काहीच संबंध नाही असा विचार करून शांत-सुखी व समाधानी राहण्यासाठी आपल्याला निसत्व-निर्जिव-निरुपद्रवी बनवून सगळ्या बाजूंनी दमन केलं जातंय याचा विचार करण्याची ही वेळ आहे. या सगळ्या घडामोडीत, घटनांमध्ये व्यवस्था कशा पद्धतीने कार्यरत आहे, ते जागरूकपणे पाहणे फार गरजेचं आहे.

बाजारकेंद्रीत भांडवली व्यवस्था एखादा बॉम्ब डिफ्यूज केल्यासारखा माणसांचा- स्त्रियांचा एक समूहच्या समूह कसा शांत करू शकली याचा विचार करायला पाहिजे. आता हा समूह प्रवाहापासून पूर्णपणे तुटलेला आहे. त्याला त्यांच्या श्रमजीवी मुळांपासून उपटून बाजारकेंद्रीत व्यवस्थेमध्ये असह्यपणे सोडून दिले आहे. यातून बाहेर पडताच येऊ नये, याची पक्की व्यवस्था आहे. निष्पाप-निरागस विश्वासाने आलेल्या या स्त्रिया त्यांच्याही नकळत भांडवलशाहीच्या जाळ्यात अडकल्या आहेत. भ्रष्टाचारी देशद्रोही-कामचुकार व्यवस्थेला नकळत हातभार लावत आहेत. आपण काय करतोय? याला काही अर्थ आहे का? असले प्रश्न त्यांना पडतच नाहीत. सगळी साधनं त्यांच्याकडे आहेत, पण साध्य काय, हेच त्यांना कळत नाही. निरर्थक कर्मकांड, सवयी यामध्ये आयुष्याची मूल्यवान वर्षे वाया चाललेली आहेत. आपला देश व आपण एक जबाबदार नागरिक म्हणून काय भूमिका वठवणार, याचा विचार व्हायला पाहिजे.

या लहान वयात अर्धवट शिक्षण घेऊन लग्न झालेल्या व त्यानंतर शहरात येऊन स्थायिक झालेल्या एका मोठ्या स्त्रीसमूहाबद्दल आपण चर्चा करत आहोत. हा मोठा समूह आता कशाकशात गुंतलाय तेही आपण पाहतोय. ही ऊर्जा आतल्या आतच कशी दडपली जाते, तेही आपण पाहतो. सासू-सून, नणंद-भावजयी, मैत्रीणी-मैत्रणी, माय-लेकी सगळ्या स्त्रियांचे एकमेकींशी भांडण - कारस्थाने आणि परत 'बाईच बाईची दुष्मन' हे तोंडावर. यातूनही ज्यांनी संधी घेऊन स्वत:ची शिक्षणं पूर्ण केली, स्वत:ची ओळख निर्माण केली, स्वत:ची, कुटुंबाची, समाजाचीही काही काळजी घेता येते का ते पाहिलं. आजूबाजूच्या परिस्थितीमध्ये घटनांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्याबरोबरीने वरील सारा समाज जर जागरूकपणे आपला राजकीय, सामाजिक सहभाग उचलेल तर सावित्री, जिजाऊ, तारा, अहिल्या, फातिमा, मालतीबाई शिरोळे, आनंदीबाई शिर्के, संत सखू, मीरा, अक्कमा, महादईसा, मुक्ता, सोयरा, जना, खदिजा या सगळ्यांचा वारसा म्हणून आपण मिरवू या.

शहरातच लहानाच्या मोठ्या झालेल्या, शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळालेल्या, नोकऱ्या करणाऱ्या, स्वता:च्या पसंतीने लग्न केलेल्या काही स्त्रीसमूहाची पण आपण चर्चा करू या. साधारण १९६०-७० च्या दशकातल्या या पदवीधर कमावत्या स्त्रिया ठरावीक यंत्रणेमध्ये नियमित काम करणाऱ्या, चांगला पगार व स्वावलंबी असणाऱ्या स्वातंत्र्य मानणाऱ्या ४५-६० या वयोगटातल्या. याचं निरीक्षण आणि चर्चा करताना यांच्या न्यूनगंडाची कारणं शोधताना लक्षात आलं की यातल्या बऱ्याच जणींना शरीरभानातून न्यूनगंड आलाय.

सौंदर्याच्या-सौष्ठवाच्या ज्या संकल्पना आपल्यावर बिंबवण्यात आलेल्या आहेत त्या मानताना माणसामाणसांमधला वेगळेपणा आपण अमान्य करतो आणि व्यवस्थेने ठरवलेले मापदंड लावून त्यामधून स्वत:ला बाद करून घेतो. हा आपण स्वत:वरच केवढा मोठा अन्याय करून घेतो, नाही का? आणि याचं भांडवल करून जर कोणी शोषण करत असेल, त्रास देत असेल तर त्याविरोधात संघर्षच केला पाहिजे ना.

व्यवस्था ज्या पद्धतीने तुटलेपणा लादतीय आपल्यावर ते नाकारून आपण जोडण्याचे उपाय शोधले पाहिजेत. आणखी फसव्या भासमय जगात न घुसता खंबीरपणाने ही परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. ही सगळी आजूबाजूची जाळी कळली पाहिजेत आपल्याला. मधल्या काळात पद्धतशिरपणे माणसाचं हळूहळू वस्तुकरण करण्यात भांडवलशाहीला जबरदस्त यश आलं आणि त्याची वजनं व मापं ठरवण्यात आली. निसर्गाला बाजूला सारून माणूस आखून-रेखून मोजून त्याचं गणित ठरू लागला. आणि माध्यमांच्या माध्यमातून ते लोकांमध्ये बिंबवू लागले.

एकीकडे धर्मसत्ता आपली पकड घट्ट करतीय व दुसरीकडे माणसाची शरीरजाणीव प्रबळ करण्याचे काम! बरोबर या चिमटीत सापडलेल्या व्यक्ती बाजाराच्या तावडीत नाहीतर बाबाबुवांच्या मठात. धर्म-संस्कृतीच्या नावाखाली सगळ्या नैसर्गिक जाणिवांचं मुंडण करायचं. कृत्रिम पद्धतीनं सगळे मार्ग बंद करायचे. अशा पद्धतीने हा असहाय दुबळा समूह तावडीत घ्यायचा आणि मग त्यांच्याकडून हवे ते कर्मकांड- अंधपूजा करून घ्यायच्या, त्यांची लूट करायची. वास्तवातून त्यांना भासात ढकलायचं आणि या भान हरवलेल्यांकडून स्वत:चा उदोउदो करून घ्यायचा. भ्रमिष्ट करून सोडलेला हा समाज काय पद्धतीनं धर्म, राष्ट्र, समाज, कुटुंब यांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करेल?

अशी हजारो लाखो लोकं अनुभूतीच्या आणि चमत्कारांच्या वाटेने चाललेली आहेत. यामध्ये स्त्रियांचे प्रमाण प्रचंड आहे. निव्वळ गुलामासारखं मानसिकत्व घडवणारे मठ-मंदिर-दर्गे याचं निरीक्षण-परीक्षण करण्याची गरज फार मोठी आहे. याला बळी पडणाऱ्या तन-मन-धन-आत्मसन्मान सगळंच कुठल्यातरी पायावर अर्पण करताना निसर्गत: आपल्यामध्ये वास करणाऱ्या प्राणाचा आपण अपमान करत नाही का?

अशा हजारो लोकांना अवतीभवतीच्या कसल्याही परिस्थितीनं काहीही फरक पडत नाही. एरवी एखाद्या गरजू, नडलेल्याला मदत करणार नाही, कष्ट करणाऱ्याला चार पैसे जास्त देणार नाहीत. जवळच्या आपल्या माणसासाठीही काही खर्च करणार नाहीत, पण भ्रमातल्या-भासातल्या संकल्पनांच्या पोटी वाटेल तेवढा खर्च करतात. कष्ट करतात? या गोष्टी विचार करायला लावणाऱ्या आहेत. एरवी बुद्धिमान, धाडसी असणाऱ्या या व्यक्ती अशा ठिकाणी एखाद्या मेंढरासारख्या, गुलामासारख्या वागतात, या गोष्टी केवढ्या गंभीर आहेत.

बाकी कशाच्याही अधेमधे न पडणाऱ्या, कसल्याही घटनांनी विचलीत न होणाऱ्या, सगळ्या जगापासून अलिप्त राहणाऱ्या शांत, सोशिक, कष्टाळू, सात्विक....

ब्राह्मणी पुरुषी भांडवलशाही कशा पद्धतीने अमलात येतीय? समाजातून अनेक गट बाजूला काढून त्यांना निरुपद्रवी करून त्यांचं ज्या पद्धतीने शोषण करतीय ते पाहता या परिस्थितीला कसा शह देता येईल याचाही विचार व्हायला पाहिजे. लोकसंख्येच्या २५% असणारा हा समाज व्यवस्थेतून बाजूला फेकला गेला आहे. यांना पुन्हा व्यवस्थेमध्ये आणण्यासाठी आपल्याला विचारांच्या माध्यमातून अथक प्रयत्न करायला लागतील. त्यांना त्यांच्या मुळाकडे घेऊन जायला लागेल.

■

ऑफिसच्या कामामध्ये मला एकदा सोलापूरमधील स्मशान भूमीत राहणाऱ्या लोकांची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. वरवर बघता ही कल्पना फार छान वाटली, पण प्रत्यक्ष जायची वेळ झाली तेव्हा मी खूप घाबरले. सर्वांच्याच मनात जी भीती असते तशीच ती माझ्या मनातही होती. स्मशानात मुलींनी जायचं असतं का? हातात खिळा ठेवायला पाहिजे का? केस बांधून जायचं का? कुठल्या दिवशी स्मशानात जायचं नसतं - अमावास्या की पौर्णिमा? गळ्यात ताविज किंवा हातात कुठला दोरा बांधायचा का? स्मशानातून आल्यानंतर अंघोळ करायची का?

असे अनेक प्रश्न भीतीमुळे निर्माण झाले होते. घाबरत घाबरतच आम्ही सोलापूरच्या मोदीबाग स्मशानात गेलो. तिथं गेल्यानंतर भरपूर लोक दिसले. हे लोक मयतीला आले होते. तिथंच मला पहिल्यांदा कळलं की काही जातींमध्ये पुरतात, जाळत नाहीत. मी तर आत्तापर्यंत समजत होते की फक्त मुस्लिम आणि ख्रिश्चन

कारण आपल्या मनात घर आणि आंगण याचं चित्र तयार असतं ना...

शेतिकेंद्रीत संस्कृतीमध्ये अंगणात रांगोळी, तुळशीचं झाड, शेजारीपाजारी घरं किंवा बागबगीचा अशी चित्रं असतात. मग याचं जतन करायचं, त्याला सजवायचं. तिन्ही सांजेला दारात कुणी रडायचं नाही किंवा उसनं मागायला जायचं नाही. अशाप्रकारे त्याचं जतन करायचं.

पण इथं तर सगळ उलट होतं. त्यांच्या घराला लागूनच मसनवटा होत्या. मोठ्या माणसांना पुरतात ती जागा. त्यानंतर लहान बाळांना पुरतात ती जागा, त्यानंतर स्मशानभूमी जिथं मयत जाळतात. हा त्यांचा शेजार!

इथंच ते दिवस-रात्र, अमावास्या असो की पौर्णिमा किंवा दसरा असो अथवा दिवाळी आपल्या कुटुंबियांसोबत राहतात. अंगणाचा विचार केला तर मयतीला आलेले लोक सगळे तिथंच बसून आपल्या प्रियजनाला अखेरचा निरोप देत असतात. त्याच्या आठवणी काढून काढून हंबरडा फोडून रडत सतात. त्या रडणाऱ्या लोकांपैकी

# स्मशानातली चूल

शरिफा बाले

धर्मातच पुरतात. पण मोदीबागच्या स्माशान भूमीत गेल्यावर मला नवीन माहिती कळली.

तिथं जवळच असलेल्या पडक्या घराच्या कट्ट्यावर मी बसले आणि थोड्या वेळातच 'नागुबाई' आल्या. इरकल नेसलेली, कपाळावर कुंकू, डोक्यावर पदर - आपल्या आज्जीसारख्याच दिसत होत्या. त्यांच्याशी बोलताना मला कळलं की त्या ५० वर्षांपासून तिथंच राहत आहेत. लग्न होऊन त्या याच घरी आल्या होत्या. याच घरात म्हणजे स्मशानभूमीत. याच घरात त्यांनी चार मुलांना जन्म दिला. त्यांचं भरण-पोषण करून त्यांना शिकवलं. लग्न लावून दिलं. त्या त्यांची माहिती सांगत होत्या आणि मी त्यांचं घर, अंगण बघत होते.

कोणाचा तरी आधार संपलेला असतो, कोणाचं तरी घर उद्ध्वस्त झालेलं असत. कोणावर तरी संकटाचं आभाळ कोसळलेलं असतं. या सगळ्यांची साक्ष देण्यासाठी उरते ती फक्त स्मशानातील राख किंवा दफन केले असेल तर थडगं (कबर).

नागुबाईच्या अंगणात रोज हाच पसारा असतो. भरपूर लोकांनी प्रेत घेऊन यावं, नागुबाईच्या मुलांनी चितेची किंवा दफनाची तयारी करावी. त्यांच्या अंगणातच जीवन-मृत्यूच्या खेळाची तालिम सुरू असते. नागुबाई मात्र सावडायच्या दिवसाची वाट बघतात. कारण त्यांच्या मुलांनी केलेल्या कामाची किंमत त्यांना तेव्हाच मिळते. त्या पैशातून मग घरासाठी सामान आणलं जातं. सण

असेल तर कपडे आणले जातात. बाजार आणला जातो आणि पोटभर जेवण मिळेल याची तजवीज केली जाते.

मी त्यांना विचारलं की तुम्हाला भीती नाही वाटत? तर त्या हसून म्हणाल्या की घाबरायचं काय त्यात. माझे सासू-सासरे हे काम करत होते. लग्न करून मी याच घरात आले. नवरा पण हीच कामं करत होता. आता नवऱ्यानंतर माझी मुलंही हेच काम करत आहेत.

कधी कधी जर कुणीच नसेल तर मलाच चिता रचावी लागते. कधीकधी हॉस्पिटलमधल्या मयती येतात. ॲक्सिडेंटवाले किंवा लावारिस असलेले मयत घेऊन हॉस्पिटलवाले कधीपण येतात. कधी कधी एकसाथ चार-पाच मयत येतात. मग कामाचा व्याप वाढतो. मग आम्हीपण मदतीला जातो. अशाप्रकारच्या मयती कधीपण येतात. दिवस-रात्र-मध्यरात्र. या कामात आराम कधीच नसतो. लहान मुलांचं तर सगळं मीच करते. त्यांच्यासाठी खड्डा खोदावा लागतो. ते सगळ मीच बघते.

मी त्यांना विचारलं मग तुमच्या मुलांना कधी कुठला आजार वगैरे किंवा मुलं लहान असताना कुठली भीती...? यावर त्यांनी अगदी आत्मविश्वासानं सांगितलं की माझ्या मुलांना कुठलाही आजार झाला नाही. या वातावरणातच ती मोठी झाली. त्यांची लग्नं पण झाली. आता घरात लोक वाढल्यामुळे सून आणि मुलांना वेगळं ठेवलं आहे. पण आम्ही तर सगळे इथेच आहोत. त्यांच्याशी बोलताना मला एक प्रश्न पडला की नागुबाईने मुलांना शिकवलं. आठवी-नववीपर्यंत मुलं शिकली. मग त्यांनी बाहेर कामंधंदे का नाही केले? हा प्रश्न विचारल्यावर त्यांनी मला उत्तर दिलं की बाहेर मजुरीला मुलं जात होती. मग इथलं बघायला कोणीच नाही. माणूस जन्माला येतो तर त्याला मरण पण आहेच ना. आम्ही पण याच्यातून बाहेर पडायचा विचार केला. पण लोकांनी फोन करून करून आमच्या दारात येऊन येऊन आम्हाला परत बोलावून घेतलं. कारण मग हे सगळं कोण करणार?

चिता रचायचं पण शास्त्र असतं. कुठल्या जातीत पाय मुडपून जाळतात. त्यांच्यासाठी छोटी चिता रचावी लागते. कुठल्या जातीत पाय सरळ ठेवून जाळतात. त्यांची मोठी चिता रचावी लागते. मयत कुठली, कुणाची आहे त्याप्रमाणे राख सांभाळून ठेवावी लागते. लोक सावडायला आले की त्यांच्या माणसाची राख त्यांना द्यावी लागते. दफनासाठी खड्डा खोदावा लागतो त्यासाठी आम्ही उंची, वजन किती आहे साधारणता ते विचारतो. कारण प्रेत जर वरच्या वरच पुरलं असेल तर त्याचा नंतर वास सुटतो. म्हणून आम्हाला खोल खड्डा खणावा लगतो. हे सगळ शास्त्र असतं.

मयतीला आलेल्या लोकांना काय ते काडी लावून निघून जातात. पण मयत पूर्ण जळेपर्यंत तिथं थांबून, जर अजून लाकडं लागली तर अजून लाकडं घालून राख होईपर्यंत जर कोणी तिथं थांबत असेल तर ते आम्हीच असतो. आमच्या जातीच्या वाट्याला आलेलं काम आम्ही इमानेइतबारे करत असतो.

किती अजब आहे ना! जेव्हा सगळे साथ सोडून जातात तेव्हा राख होईपर्यंत तिथं थांबणाऱ्या लोकांबद्दल आपल्याला माहीतच नसतं. आपण कधीच असा विचार करत नाही की ज्या स्मशानात चिता जळत असतात तिथंच शेजारी चूल पण जळत असेल. आपण अशी कल्पना पण करू शकत नाही. कारण आपण खूप घाबरत असतो. नको त्या गोष्टींचा बाऊ करतो. अशा गोष्टींपासून स्वत:ला वाचवायलासुद्धा नको ते उद्योग करत बसतो. सत्य समजून घेतच नाही. माणसांना किती प्रकारच्या भीती असतात. भूता-प्रेताची भीती, नोकरदारांना त्यांच्या नोकरीची भीती, श्रीमंतांना चोरीमारीची भीती. अशा अवास्तव भीतींसोबतच आपण जगत असतो. विशेषत: स्त्रीवर्ग. ज्यांना या पुरुषप्रधान संस्कृतीने घाबरून जगायला भाग पाडले आहे. त्याही फावल्या वेळेत काही चांगलं काम करण्याऐवजी अशा अवास्तव भीतीच्या जाळ्यात अडकतात आणि मग आजच्या जगात जे सुरू आहे - बाबा, भोंदू, साधू जे स्वत:ला राजाच समजतात. स्वत:च्या हातांनी डोक्यावर हिरे-मोत्यांचे मुकुट ठेवतात. नको ते उपदेष, प्रवचने देत बसतात.

सर्वात विनोदी म्हणजे तेजस्वी माणसाचा चेहरा

दिसावा म्हणून स्पेशल ग्राफिक्सचा उपयोग करून स्वत:च्या फोटोवर चेहऱ्याभोवती प्रकाशाची वलयं निर्माण झाल्याचा आभास निर्माण होईल असे फोटो काढून ती रस्त्या-रस्त्यांवर, नाक्यानाक्यांवर आणि चौकांत लावतात. जनतेच्या पैशांनी मोठ-मोठे आश्रम बनवतात. त्या आश्रमांमध्ये जास्त करून स्त्रीवर्गच जात असतो. ज्या अशाप्रकारच्या जाळ्यात अडकलेल्या असतात. किंबहुना त्यांना अडकवलेलं असतं. तिथं त्यांना सांगितलं जातं की तिथं मन:शांती मिळते. मनोकामना पूर्ण होते. पण त्यांच्या नकळतच त्या पुरुषप्रधानतेच्या धार्मिक चेहरा असलेल्या आणखी एका जाळ्यात स्वत:ला अडकवून बसतात. तिथं काय प्रकारचं शोषण होतं हे आजकालच्या बातम्यांमध्ये पाहिलं आहे ना.

अजून वाईट परिस्थिती म्हणजे याची कुठं तक्रार करू शकत नाही. कारण अशा आश्रमांचा प्रचार आणि प्रसार खूप मोठा असतो. तिथं राजकीय पुढाऱ्यांपासून ते उद्योगपतींपर्यंत सगळ्यांपर्यंत पोहोच असते. अर्थात सगळेच आश्रम वाईट असतात असे नाही. पण आजच्या कलीयुगात चांगले आश्रम तरी किती असणार, याची सुद्धा हमी देऊ शकत नाही.

'रेहने दो आसमा, जमीन की तलाश कर । सब कुछ यही मिलेगा ना किसी की आस कर । हो जाये पुरी रह तमन्ना तो जिने का क्या मजा है? जिंदगी जिने के लिए बस एक कमी की तलाश कर ।''

मुळात आपल्याला हा प्रश्न पडायला पाहिजे की मी घाबरते कशाला? मृत्यूला, अपयशाला? आपण आपल्या मनाला या सत्याची ओळखच करून देत नाही, की जन्माला आलेला प्रत्येकजण कधी ना कधी संपणारच. यश आणि अपयश या जीवनप्रवासातले डोंगर आहेत. चढाला गेलो की उताराला लागणारच आणि उताराला असू तर चढ चढावा लागणारच. या चढ-उताराच्या प्रवासाला तर जीवन म्हणतात ना. यासाठी आपल्यालाच मेहनत करावी लागणार आहे. यासारख्या आश्रम किंवा अंधश्रद्धांवर विश्वास ठेवून आपण आपल्या मनाला भूल देऊन त्याला झोपेत ठेवतो. अशा अवस्थेतच अवास्तव भीतीला कवटाळून बसतो. मग अशा ढोंगी बाबांचे जास्त फावते. भांडवलशाहीच्या संचयवृत्तीने आपणसुद्धा इतके ग्रासले आहोत की आपणसुद्धा शिखराच्या टोकावरच राहायचं बघतो आणि जर कोणी इतर त्या दिशेने येताना दिसले की अशा खोट्या अंधश्रद्धांच्या नादाला लागून प्रसाद, हिरे, मोती, सोने, चांदी चढवून त्यातच धन्यता मानतो आणि देवाजवळ आग्रह धरतो की फक्त मीच शिखरावर असायला पाहिजे. इतर कोणी नाही.

''सोच को बदलो, सितारे बदल जायेंगे
नजर को बदलो, नजारे बदल जायेंगे
कश्तीयाँ बदलने की जरुरत नही,
दिशाओंको बदलो, किनारे बदल जायेंगे ।''

शेतिव्यवस्थेमध्ये आपण सगळे एकमेकांवर अवलंबून असायचो. त्यामुळे एकदुसऱ्यांची जाणीव, मान-सन्मान ठेवला जायचा. पण आत्ताच्या प्रगतीच्या काळात हे अवलंबित्व संपुष्टात येत आहे. म्हणूनच मग आपण स्वत:लाच फार शक्तिशाली समजतो. जेव्हा केव्हा आपली शक्ती कमी होण्याची भीती वाटते तेव्हा उत्तर शोधायलाही स्वयंघोषित राजा-महाराजांकडे म्हणजे अशा भोंदू बाबांकडे जातो.

विशेषत: स्त्री वर्ग. त्यांनी विचार करायला पाहिजे की याच पृथ्वीवर अंधारात काही पडलं तर घाबरून ओरडणाऱ्या स्त्रियाही आहेत आणि याच पृथ्वीवर नागुबाईसारख्या स्त्रियाही आहेत. कदाचित एखाद्या अमावास्येच्या मध्यरात्री जेव्हा सर्वत्र किर्र अंधार असेल, आपण आपल्या घरी जिथं आपण असल्या बाबांचे फोटो किंवा मंत्र लावून भूत-प्रेत येणार नाही याची तजवीच करून ठेवलेली असते. तेव्हा नागुबाईसारखी धाडसी स्त्री स्मशानातच एखाद्याची चिता रचत असते.

शहर से चला तो दिल मे अरमान थे,
एक तरफ बस्ती तो एक तरफ शमशान थे,
पैरों तले एक हड्डी आयी उसके भी
कुछ बयान थे ।
चलनेवाले बचकर चल हम भी कभी इनसान थे ।

■

सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी स्त्री-शिक्षणासाठी केलेले प्रयत्न व योगदान स्त्री-उन्नतीसाठी अनमोल ठेवाच आहे. त्यांनी केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या प्रसारकार्यामुळेच आज स्त्री प्रगत झाली आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने ती काम करीत आहे. मग ती अंतराळ क्षेत्रातील कल्पना चावला असो अथवा भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील असोत. सावित्रीबाईंचा हाच वसा घेऊन वैद्यकीय क्षेत्रात मराठवाड्यातील एक व्यक्तिमत्त्व असलेल्या प्लॅस्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन डॉ० उज्ज्वला दहिफळे या असोत.

डॉ० उज्ज्वला दहिफळे एक हुषार मुलगी. घरात शिक्षणासाठी पोषक असे वातावरण होते. लातूर जिल्ह्यातील चिखली या खेडेगावात त्यांचे शिक्षण झाले आहे. अभ्यासात विलक्षण हुषार. शिवाय भाऊ डॉक्टर.



# मुलाखत : आचार-विचार हेच खरं सौंदर्य । डॉ० उज्ज्वला दहिफळे

संवादक : झेबा शेख-मिन्ने

उज्ज्वलाताईंनी डॉक्टर व्हावं, असा घरातल्यांचा भक्कम पाठिंबा होता. या पाठिंब्याच्याच बळावर उज्ज्वलाताई मेडिकल क्षेत्रात चमकल्या. तसे त्यांना आयएएस, आयपीएस ऑफिसर होणेही अशक्य नव्हते. एमबीबीएस पास झाल्यानंतर सुपर स्पेशालिस्ट म्हणून प्लॅस्टिक आणि कॉस्मेटिक सर्जरीचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले.

अत्यंत साध्या, पण आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या डॉ० उज्ज्वलाताई आपल्या खुर्चीत बसून एका पेशंटबद्दल निदान करत होत्या. त्यांच्या दृष्टीने स्त्रीने सुंदर असण्यासाठी फक्त तिचे बाह्यसौंदर्यच छान असले पाहिजे असे नाही, तर तिचे आचार-विचारही चांगले असावेत. चारित्र्य चांगले असावे, म्हणजे ती स्त्री अतिसुंदर असते.



स्त्रियांच्या संबंधाने विषयाची उकल करता करता मी त्यांना काही प्रश्न विचारले, त्यांची उत्तरेही ताईंनी शास्त्रीय कसोटी लावत स्पष्टपणे दिली.

झेबा - ताई, निसर्ग जन्मत: स्त्रियांची शारीरिक रचना पुरुषांपेक्षा वेगळी करतो का?

उज्ज्वलाताई : साहजिकच निसर्गाने स्त्रीची शारीरिक रचना पुरुषापेक्षा वेगळी केली आहे. पण ही स्त्री-पुरुषाची भिन्नता मुलं वयात आल्यानंतरच जाणवते. वयात आल्यावरच मुलास कंठ फुटतो. त्यांना दाढीमिशा येतात व त्यांच्या मर्दानी सौंदर्यात भर पडते. तसं पाहिलं तर मुलींच्या सौंदर्याकडे लहानपणापासून ते खुलविण्याचे जास्त प्रयत्न केले जातात. पण आजच्या काळात स्त्री इतकाच पुरुषही आपल्या सौंदर्याबाबत जागरूक झाला आहे. स्त्रियांसारखेच पुरुषही वेगवेगळे हेअरकट्स, केसांना जेल वापरून आपली हेअरस्टाईल करत असतात. केस विरळ असतील तर परमनंट प्लँटेशन करून घेतात. मॉडेल पुरुष भुवयांवरील अनावश्यक केस काढून घेऊन डोळ्यांचे सौंदर्य वाढवितात. पिंपल ट्रिटमेंट घेतात.

झेबा - सौंदर्याच्या पारंपरिक कल्पना काय आहेत?

उज्ज्वलाताई : पूर्वीच्या सुंदर स्त्रीच्या कल्पना म्हणजे तिचे केस चांगले असणे, नाकीडोळी नीटस असणे, सशक्त असणे या होत्या. एखाद्या स्त्रीचे केस लांब, चमकदार असले की तिची सौंदर्यवतीशी तुलना करत. नैसर्गिकच ओठ गुलाबी राखण्यासाठी त्या दुधाची साय ओठावर लावत असत. त्यासाठी आजच्यासारखी व्हिटॅमिन ई-युक्त लिपस्टिक वापरत नसत. चेहरा टवटवीत दिसण्यासाठी घरगुती पिठे, मध, फळांचा रस, दूध यांचा वापर फेसपॅकसारखा करत. रिठा-शिकेकाई, नागरमोथा, आवळा यांचा केस धुण्यासाठी वापर करून केस चमकदार करत असत. केसांत मोगरा, जाईजुईसारख्या फुलांचे गजरे माळून आजच्या परफ्युमसारखा त्याचा वापर होत असे. या स्त्रीच्या सौंदर्याच्या पारंपरिक कल्पना होत्या. पण आज या संकल्पना आमूलाग्र बदलल्या आहेत.

झेबा - स्त्रिया शिकल्या, स्वावलंबी झाल्या; परंतु त्यांच्या सौंदर्याच्या पारंपरिक कल्पनांमध्ये फरक पडला आहे का?

उज्ज्वलाताई : जसजशी स्त्री स्वावलंबी झाली, पुरुषाच्या बरोबरीने वावरू लागली, तसतशा तिच्या सौंदर्याच्या संकल्पना बदलल्या. आता पूर्वीच्या लांब केसांऐवजी केसांचे चेहऱ्याला शोभतील असे लहान-मोठे हेअरकट करून, त्यांना कलर करून स्त्रिया हेअरस्टाईल बदलू लागल्या आहेत. भुवयांना आकार दिला जाऊ लागला. डोळ्यांचे सौंदर्य वाढविण्यासाठी आयलायनर, मस्करा, काजळ पेन्सिल, आयशॅडो यांचा वापर होऊ लागला.

झेबा - या संकल्पनांचा उपयोग बाजार कसा करून घेतो?

उज्ज्वलाताई : वरील संकल्पनांमुळेच सौंदर्य-प्रसाधनांची मोठी बाजारपेठ आज तयार झाली. त्यामध्ये करोडो रुपयांची उलाढाल होते. खेड्यांतील मुलीसुद्धा आयब्रो, हेअरकट्स, फेशियल करण्यासाठी ब्युटिपार्लरमध्ये जाऊ लागल्या. यासाठी कमीत कमी महिन्यातून एकदा तरी पार्लरला जावे लागते. यासाठी पुढची पायरी म्हणजे मग हे अनावश्यक केस कायमचे काढून टाकून सौंदर्य वाढविणे. विरळ केसांना दाट करणे, चेहऱ्याला फेअरनेस क्रीम लावणे, ब्लिचिंग करून चेहऱ्याची त्वचा गोरी करणे, फेशियल करून चेहरा चमकदार बनविणे, यासाठी

वेगवेगळ्या ट्रिटमेंट घेणे, अनावश्यक केस लेझरने काढणे, चेहऱ्यावरील डाग घालविणे, यासाठी कॉस्मेटिक सर्जनची गरज भासू लागली, ज्याचा शरीरशास्त्राचा पूर्ण, सखोल अभ्यास आहे, अशा तज्ज्ञांची गरज भासू लागली.

आधुनिक युगात या ट्रिटमेंटची माहिती सर्वसामान्य माणसाला- जे सौंदर्यात आपला आदर्श हिरो-हिरॉईनना मानतात त्यांच्या हेअरस्टाईलवरून कळू लागली, ते टीव्ही, पिक्चर पाहूनच. सर्वसामान्य स्त्रीपुरुष सौंदर्य दाखवण्यासाठी पैसे खर्च करू लागले. पण याहीपेक्षा बारकाईने लक्ष हायफाय सोसायट्यांतील लोक देऊ लागले. यासाठी या सर्व ॲडव्हान्स ट्रिटमेंटची माहिती आधुनिक तंत्रज्ञान कॉम्प्युटर्सवर इंटरनेटच्या माध्यमातून मिळवू लागले. हायक्लास सोसायट्यांतील पुरुषच स्वत:च ही माहिती घेऊन आपल्या बायकोला ट्रिटमेंटसाठी घेऊन येतात व ट्रिटमेंट करायला सांगतात. काही पेशंटना मला ही सखोल माहिती द्यावी लागत नाही, कारण त्यांनीच सर्व माहिती इंटरनेटद्वारे मिळवलेली असते. यापुढे आतातर नुसते लग्न ठरले तरी ही श्रीमंत पुरुषमंडळी आपल्या होणाऱ्या भावी वधूला योग्य ती मापे देऊन त्यांना हव्या त्या साईजमध्ये तिच्या शरीराला आकार देण्यास सांगतात. सर्वसामान्य माणसांच्या कल्पनेपलीकडे हे जग बदललेले आधुनिक सौंदर्यविश्व आहे. पूर्वी साडीमध्ये झाकलेले स्त्रीचे सौंदर्य यासाठी फीगरची गरज नव्हती. उलट भरलेली स्त्री म्हणजे खाऊनपिऊन सुखी असणारी स्त्री होती.

आता इंचाइंचाने स्त्रीच्या कमरेत, वक्षस्थळांत बदल करून फिगरद्वारे तिचे सौंदर्य आकर्षक केले जाते. पाश्चिमात्य कपडे घातल्यानंतर जास्तीत जास्त स्त्रिया फिगरकडे लक्ष देऊ लागल्या. वक्ष झाकण्यासाठी साडीचा पदर या गोष्टी दूर जाऊ लागल्या. मग आपली फीगर कशी व्यवस्थित दिसेल यासाठी मुलींचे प्रयत्न होऊ लागले. हे तर फक्त बाहेरून दिसण्यासाठी म्हणजे बाह्यसौंदर्य वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात होते. परंतु सेक्ससारखा विषय पूर्वी लग्नाअगोदर कधीही चर्चिला न जाणारा विषय होता. सेक्समधील स्वर्गसुख व्यवस्थित मिळवण्यासाठी इंटरनेटद्वारे ज्ञान उपलब्ध करून योनीच्या परफेक्ट साईजची मापे देऊन लग्नाअगोदरच योनिमार्गाची सर्जरी करून त्या पुरुषाला हवे तशी साईज देऊन मुळची योनीची सर्जरी करून घेतात. इतके हे शास्त्र प्रगत झाले आहे. अजूनतरी पुरुषप्रधानच संस्कृती आहे. यामध्ये स्त्रियांनी किती सहभाग घ्यायचा हे तिने ठरवले पाहिजे. सध्यातरी वरील फॅड हायक्लास सोसायट्यांमध्येच आहे. सर्वसामान्य लोक यासाठी पैसा खर्च करू शकत नाहीत. हायक्लास सोसायटीतील या स्त्रिया भरपूर पैसा असल्यामुळे सौंदर्याच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अगणिक कॉस्मेटिक सर्जरी करून घेतात आणि शेवटी डिप्रेशनमध्ये जातात. सदैव टेन्शनमध्ये असतात की या ट्रिटमेंटमुळे किती दिवस मी आकर्षक दिसेन. नंतर त्याचे काय दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होतील. शेवटी नैसर्गिक सौंदर्य व कृत्रिम सौंदर्य यात फरक आहेच. कोणतीही स्पर्धा असावी, पण ती हेल्दी कॉम्पिटीशन असावी. अवास्तव कल्पना करून केलेली ट्रिटमेंट नसावी.

झेबा - मुलींना वाढवतानाच त्यांच्यामध्ये सौंदर्याचे भाव-अभाव अधोरेखित केले जातात का?

उज्ज्वलाताई : मुलांपेक्षा मुलींना लहानपणापासून वाढवताना त्यांच्या सौंदर्याचे भाव अधोरेखित केले जातात. प्रत्येक वेळी मुलींच्या कपड्यांकडे, केसांकडे त्यांची निगा राखण्यासाठी ट्रिटमेंट करतात. वेगवेगळ्या रंगाचे फॅशनचे कपडे, कानातली, केसांतली आभूषणे, हेअरकट्स करून तिचे सौंदर्य वाढवितात. तिला चालण्याची, बोलण्याची, उठण्या-बसण्याच्या चांगल्या सवयी शिकविल्या जातात. वयात येण्याअगोदरपासूनच तिच्या सौंदर्याची काळजी घेतली जाते.

झेबा - कॉस्मेटिक सर्जरी किंवा प्लॅस्टिकसर्जरी, सौंदर्याचे विचार व प्रगत वैद्यकीयशास्त्र यामध्ये या सर्व सौंदर्यशास्त्राची उत्तरे आहेत का?

उज्ज्वलाताई : कॉस्मेटिक सर्जरी म्हणजे जे देवाने सौंदर्य दिले आहे, त्यात थोडाफार बदल करून चांगले करण्याचा प्रयत्न करणे. उदा. एखाद्या व्यक्तीचे नाक नकटे असेल अथवा मोठे असेल तर सर्जरीने त्या नाकास शेंडा करणे. या सर्जरीमध्ये सेम टू सेम काही शक्य

नसते. एखाद्या कुरूप चेहऱ्याला सौंदर्यवती मधुबालासारखा चेहरा करण्याइतके बदल या सर्जरीत शक्य होत नाही.

प्लॅस्टिक सर्जरी म्हणजे एखाद्याला जन्मत:च व्यंग आहे, एखाद्या लहान मुलाचा ओठ जन्मत:च चिरलेला आहे, तर त्यास शिवून प्लॅस्टिकसर्जरी करून ओठाच्या आकारात बदल करणे. यात शंभर टक्के रिझल्टस् नाहीत. पण बरेचसे व्यंग झाकले जाते. कॉस्मेटिक ट्रिटमेंट म्हणजे पिंपल्सचे व्रण- चेहऱ्यावरील काळे डाग लेझरने काढणे, फीलरने व्रण भरणे, अनावश्यक केस कायमस्वरूपी काढणे हे सर्व तंत्र उपचारासाठी वापरताना आपल्याला प्रगत वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञाची गरज असते.

फिगर मेंटेन करताना अनावश्यक वाढलेली चरबी काढून कंबर कमनीय केली जाते. वक्षांना भरीव आकार देऊन ते मोठे केले जातात. रंग गोरा करणे याचे उदाहरण म्हणजे मायकेल जॅकसन होय. म्हणजेच प्रगत शास्त्रात सौंदर्याच्या कुठल्याही प्रश्नाला उत्तरे आहेत.

हायक्लास सोसायटीतून कॉस्मेटिक प्लॅस्टिक सर्जरीला प्रचंड प्रतिसाद मिळतोय. त्यांचा सौंदर्यवती होण्यासाठी असलेला अट्टहास आधुनिक तंत्रज्ञानातून मिळवलेल्या माहितीतून सेक्ससुद्धा कसा आनंदाने उपभोगावा, यासाठी तरुणांचा मुलींना या शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी असलेला पाठिंबा, हे सर्व पाहिले की वाटते कुठे त्या पारंपरिक सौंदर्याच्या कल्पना व कुठे या आधुनिक सौंदर्याच्या कल्पना पोहोचल्या आहेत!

कुठलेही काम असो, जेव्हा माणूस ते काम आवडीने स्वीकारतो तेव्हाच तो खऱ्याखुऱ्या जीवनाचा आनंद उपभोगत असतो. म्हणूनच डॉ. उज्ज्वला दिवसरात्र काम करूनही थकत नाहीत. या व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकीचे भानही त्यांनी ठेवले आहे. त्या गरीब, गरजू व्यंग असणाऱ्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करतात. त्या रुग्णाच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान यातच त्यांच्या शस्त्रक्रिया बिलाची पावती डॉ० उज्ज्वला दहिफळे यांना मिळालेली असते.

■

---

**स्त्रीराज्या**ला वेदात **वैराज्** म्हटले आहे...जगभर शेतीचा शोध स्त्रीने लावला. शेतीतून मानवसमाजाचे भटके असुरक्षित जीवन संपून तो स्थिर होतो आणि संस्कृती प्रसवतो. स्त्री-गणार्धाने शेती केली तरच ती पिकते अशी पुरुष-गणार्धाचीही श्रद्धा असल्याने स्त्री गणशेतीची मालक झाली आणि समाजाची शास्ती होऊन **वैराज्** आले. स्त्रिया खेत्त वा क्षेत्राच्या मालक म्हणून ङ्खखत्तफ वा ङ्कक्षत्रफ वर्ण झाल्या. त्यांनी निवडलेली सर्वोत्तम स्त्री वि+राज्(ट्), म्हणजे राणी झाली. म्हणून या समाजाचे नाव **वैराज्** पडले. या विराज्(ट्)ने लोकशाही शासनाच्या सभा व समिती या संस्था निर्मिल्या असे अथर्ववेदाचे ङ्कविराज्फ हे सूक्त सांगते. कृषिमाया हे केवळ क्षत्रांचे रहस्य म्हणून सभा केवळ स्त्रियांची बनली, तर बाकीचा कारभार समानतेने व्हावा म्हणून समिती स्त्रीपुरुषांची.

ङ्कसमितीफचा अर्थच समानता होतो. ही आद्य विराज्(ट्) **निर्ऋति** होती. आणि तिने रचलेली गायन, वादन व नृत्याची आद्य माया शेतीची म्हणून तिचे नाव तांत्रिक श्रुती पडले. ङ्कतंत्रफ शब्द वेदात एकदाच १०.७१.९ या ऋचेत येतो आणि त्याचा अर्थ **शेती** होतो. या तांत्रिक श्रुतीच्या आर्ष संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा ङ्कस्वतंत्र : कर्ता ।।फ हा नियम असला, तरी महाभाष्यकार पतंजलीनुसार त्याचा अर्थ होतो ङ्कउत्पादन साधन ज्याच्या मालकीचे तो स्वतंत्र.फ शेती हे उत्पादन साधन स्त्रीसत्ताक गणा तर्फे क्षत्र-स्त्रियांच्या मालकीचे म्हणून हा **वैराज्** समाज निसर्गाधीन न राहता स्वतंत्र बनला. वैराजाची शेती, तिचे पीक व इतर गणधन यांचे घटक कुलांमध्ये समान वाटपासाठी आणि सभा व समिती यांच्यावर अनुक्रमे सभ्य व सामित्य निवडून पाठवण्यासाठी व मतदानासाठी **निर्ऋति**ने चौपट (अधिदेवन व इरिण) वा अक्ष वा शलाका वा छंद शोधून काढले. अशाप्रकारे **स्वातंत्र्य; समता व लोकशाही** या त्रिसूत्रीचे प्रवर्तन फ्रेंच क्रांतीच्या किती तरी आधी **वैराज्** वा **स्त्रीराज्या**ने केले.

- प्राच्यविद्याविद् **शरद् पाटील**

■

## कविता

### शोभा करांडे

### गुंफन

देह डोह विशाल ।
मन मासोळी चंचल ।
वनसावल्या घनदाट ।
त्याने भरला घाट ।
मन मासोळी सुसाट ।
स्वैर-स्वच्छंद फिरते घाट ।
कधी विरघळून जाते वाट ।
मध्ये जल्लोशाचा काळ ।
जमिनीवर पाय ना ठरणार ।
कधी उदास वणव्या राती ।
कोंडून जाती जीवन गती ।
मग पडतो विचार मन होते बेजार ।
कशी करावी मात ।
तना-मनाची असावी ।
एक-दुसऱ्याला साथ ।
■



### स्त्री राजकारणी

डोक्यावर टोप्या फेटे बांधून
राजकारणात उतरणाऱ्या
माझ्या मायबहिणींनो...
आधी राजकारण समजून घ्या
सत्ता राबवायची तर देश नीट बघून घ्या
इथली जमीन-पाणी-दऱ्याखोऱ्या-डोंगर
वन-जंगल-पशूपक्षी-झाडे-निसर्ग
यांची गाणी गुणगुणून ऐकून घ्या
इथली माती-जाती वर्गाची
गणितं गिरवून शिकून घ्या
इथल्या रितीभाती
इथली नातीगोती
समाजाची नाडी हाताळून घ्या
अथलं पीकपाणी
इथली तोडणी लावणी
अर्थशास्त्र-समाजशास्त्र-राजकारण
पहिली मातृसत्ता आपला समृद्ध वारसा
निर्ऋति-हरिती-रझिया-चांदबिबी-जिजाऊ
अहिल्या-तारा-कित्तूरचन्नम्मा
इंद्राणी-कैकयी संघर्ष आठवा
डोक्यावर काय बांधायचे मग ठरवा
मग ठरवा...
■


G. M. ARCH Pvt. Ltd.
ARCHITECTS. INTERIOR DESIGNERS. ENGINEERS. PROJECT MANAGEMENT CONSULTANTS.
Corporate Off. : R. no. 2570, Bldg. no. 56, Gandhi Nagar, M.H.B. Colony, Bandra (E), Mumbai-400 051
Tel. : 022 2640 0512 Fax: 2640 0514
Regd. Off. : K.K. Chambers, Purushottamdas Thakurdas Road, Fort, (E), Mumbai-400 001
Tel. : 022 6633 3931 Fax: 6633 3932
Website: www.gmarch.in
E-mail : gmarch.pgr@gmail.com / gmarch@rediffmail.com / info@gmarch.in
G. M. ARCH PVT. LTD.

Registered with the registrar of Newspapers for India Under No. MAHMAR/2013/52241


# करांडेज् सगुणा हॉल

पंढरपूर-सातारा रोड, तांदूळवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर






- १०००० चौ. फूट आकाराचा सुसज्ज बहुउद्देशीय हॉल
- लग्नकार्य, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त
- भरपूर पाणी व अखंडित वीजपुरवठा (जनरेटरची सोय) उपलब्ध
- ५०० गाड्यांसाठी पार्किंग उपलब्ध
- ३००० चौरस फुटांचा जेवणासाठीचा स्वतंत्र सुसज्ज हॉल.
- हवेशीर वातावरण.

: बुकिंगसाठी संपर्क :

अरुण करांडे : ९८२०२३५०३०

लक्ष्मण ढवळे : ९९२२२६३३६४